## असे भक्त अशी भक्ती

# भारुड रंगी रंगलेले साईभक्त 'सांडभोर'

❖❖❖

**श्री साईबाबांचे एक भक्त श्री. रघुनाथ सांडभोर यांचा परिचय सर्व साईभक्तांना आहे. गेली ४० वर्षे ते शिरडीतील उत्सवांमध्ये भारुडांनी रंगत आणून आपली साईसेवा अपार निष्ठेने करीत आहे. त्यांच्याबद्दल थोडेसे...**

❖❖❖



श्री रघुनाथ सांडभोर हे खेड जवळील 'किन्हेवाडी' या खेडेगावात जन्मले. घरची परिस्थिती बेताचीच. बालवयात शाळेच्या नाटकामधून छोट्या मोठ्या भूमिका ते करू लागले असताना त्यांच्यातील अभिनय जागा होऊन वाढीला लागला. आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना शिक्षण अर्धवट सोडून चरितार्थासाठी पुण्याला स्थलांतर करावे लागले. गावी असताना होळीच्या सणानिमित्त गावात पाच दिवस सांस्कृतिक कार्यक्रम होत असत. त्यात मुख्यतः 'भारुड' या भक्तिमार्गातील एक प्रकारचा कार्यक्रम होत असे. त्यात ते भाग घेत असत.

पुण्यात नोकरी करीत असताना कलावंताचा त्यांचा पिंड त्यांना स्वस्थ बसू देईना. सुदैवाने त्यांना श्री शेलार मामा यांनी अंधश्रद्धेवरील भारुड करावयास उद्युक्त केले. तसेच श्री अप्पासाहेब. इनामदार यांच्या सहवासाने त्यांना अतिशय मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच मुंबईचे श्री. अण्णा जोशी, विठ्ठल उमप यांचेही मार्गदर्शन लाभले. लोककलेचे उपासक श्री. अशोकजी परांजपे यांनी त्यांना वेळोवेळी संधी देऊन त्यांच्यातील अभिनयाला खतपाणी घालून वाढीला लावले. श्री. विश्वासराव सरपोतदार आणि श्री. निळूभाऊ फुले यांच्या मार्गदर्शनाने ते चित्रपट माध्यमाकडे खेचले गेले.

मराठी नाट्य परिषद, पुणे इंडियन नॅशनल थिएटर, भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयातर्फे 'फुलोरा' या लोककलेच्या कार्यक्रमात पुणे फेस्टिव्हलच्या 'मुजरा लोककले'चा कार्यक्रमात भाग घेण्याची संधी त्यांना मिळाली व त्याचा त्यांनी चांगला उपयोग करून घेतला. **शिर्डी येथील साईबाबा संस्थानातर्फे दरवर्षी त्यांचे भारुडाचे कार्यक्रम गेली ४०-५० वर्षे सातत्याने होत आहेत. रामनवमी, दसरा व गुरुपौर्णिमा असे वर्षातून तीन वेळा हे कार्यक्रम होत असतात.**

आत्तापर्यंत त्यांनी जवळ जवळ ५० चित्रपटातून लहानमोठ्या भूमिका केल्या आहेत. त्यात सवत, एक डाव भूताचा, डाळिंबी, थोरली जाऊ, बोला दाजीबा, झेड पी, आम्ही दोघं राजाराणी, गजानन महाराज, चोराच्या मनात चांदणं, माहेरची साडी, आली अंगावर, तेरे मेरे बीच में इ. काही महत्त्वाचे चित्रपट होय. तसेच त्यांनी टी.व्ही. माध्यमातूनही संचार केला आहे. सबका मालिक एक, येथे नांदतो बाळ, अपने हुये पराये, इ. टी.व्ही. मालिकेतही ते चमकले आहेत- पुणेरी पुणेकर, रेशमी धागा, अश्वमेध. भारुडाच्या क्षेत्रात तर त्यांचा हातखंडा आहे.

'भारुड' हे मुख्यतः संत एकनाथांनी रुढ केले. भारुडाचे अनेक प्रकार आहेत. विशेषतः लोककला माध्यमाला प्राधान्य देऊन 'भारुड' केले जाते. भक्तिमार्गाचा 'भारुड' हा एक प्रकार आहे. विंचू, जोगवा, नवरा बायकोचा झगडा, रोडगा, वारिक, भूत, मुका, घोंगडी, मदार, वेडी, चोपदार, फकीर, गोंधळी, वाघ्या मुरळी, वासुदेव, बहुरुपी, भूत्या, जोशी बुवा, अंधश्रद्धा इ. अनेक विषयावर भारुड केले जाते. श्री. सांडभोर या सर्व विषयांवरील भारुड करतात. महाराष्ट्रात त्यांनी आजतागायत हजार बाराशेपेक्षा जास्त भारुडे केली आहेत. आज त्यांचे वय सत्तरीत आहे, परंतु आजही ते चपळतेने नाचून, गाऊन भारुडाची रंगत वाढीला लावतात.

लातूर जिल्ह्यातील एका गावात जोहार हे भारुड प्रेक्षकांनी बंद पाडले. परंतु संतांच्या भक्तिमार्गातील अभंगात जोहार मायबाप असून श्री. सुधीर फडके यांनी हा अभंग एका चित्रपटात गाऊन सन्मानीत केला आहे, हे स्पष्टीकरण केल्यानंतर जोहार मायबाप म्हणावयास प्रेक्षकांनी संमती दिली ते भारुड लोकांना अतिशय आवडून त्यास दाद दिली. भविष्यकाळात ते यशोमंदिर गाठतील यात संदेह नाही. त्यांच्याच शब्दात या लेखाचा समारोप करणे उचित होईल. देह कुडी एक रंग, आत्मा जातो कोणाकडे ? काडीमोडीचा पिंजरा केला, त्यात राघू बसविला ! राघू मोठा ज्ञानी धनी, बोली बोले मंजुळवाणी ! यमराज तयार झाले, राघोबाला घेऊन गेले ! तुका म्हणे राघू गेला, पिंजरा मातीत दडविला ।।

# ‘भक्ती’चे महात्म्य

(पूर्वार्ध)

– वसंत दळवी



❖❖❖

**कर्म, ज्ञान आणि भक्ती या मार्गाने आपणास ईश्वराची आराधना करता येते, ईश्वर प्राप्ती होऊ शकते. श्रीमद भगवद् गीतेमध्ये कर्म, ज्ञान, योग याबरोबरच भगवान श्रीकृष्ण भक्तीचे अनन्यसाधारण महत्व अर्जुनास सांगतात. अशा या ‘भक्ती’ बद्दल आपणास सांगताहेत श्री साईलीलाचे एक लेखक श्री. वसंत दळवी.**

❖❖❖

हिंदू धर्म जुने सोडत नाही हे खरे पण त्याने नवीन विचारांनाही दारे कधी बंद केली नाहीत. म्हणून हिंदू-वैदिकधर्माचा चैतन्यशील, नित्यनुतन, पवित्र प्रवाह अखंड वाहत राहिला आहे. त्यात पवित्र, मंगल असेल तेवढेच उरते. अवतारी, साक्षात्कारी संत, महात्मे ह्यांचे स्वानुभवी बोल व उपदेश, त्यातील पावित्र्य व शक्तीमुळे चिरंतन पावले आहेत.

कालक्रमाने कर्मकांड परिस्थितीमुळे कालबाह्य झाले तरी त्यातील विचार, त्यामागचा हेतू व आचार धर्म अबाधित राहिला. काळाची गरज म्हणून संतांनी कलियुगासाठी साधे, सोपे, सरळ व कोणतेही अवडंबर नसलेले ‘भक्ती’चे साधन उपलब्ध करून

दिले. जनमानसांच्या अंतःकरणात त्याने स्थान मिळविले व पाहता पाहता भक्तीचा प्रसार, प्रचार, विस्तार अखंड होत राहिला. कर्मयोग व ज्ञानयोग ह्यांचा सुंदर संगम भक्तियोगात आढळतो. वेदातील कर्मकांड व उपनिषदातील ज्ञानकांड ह्यांना जोडणारा भक्ती हा दुवा आहे. भक्ती हा सर्वश्रेष्ठ मार्ग असून आचरण्यास सुलभ असा आहे.

अशा ह्या परम पावन भक्तीचा उपदेश श्रीसाईबाबांनी आपल्या 'श्रीसाईसच्चरिता'तून कथा, दृष्टांत, लीला ह्या माध्यमातून केला आहे. सामान्य माणसाविषयी असलेली करुणा व त्याच्या उद्धाराची कळकळ व तळमळ ह्यांचे प्रत्यंतर 'श्रीसाईसच्चरितात' दिसून येईल. सकाम-निष्काम भक्तांच्या कामना पुरवणारे श्रीसाईबाबा कल्पतरू आहेत.

हेमाडपंत लिखित 'श्रीसाईसच्चरित्' हे अक्षर भांडार आहे. परमेश्वराच्या मुखातून प्रगट झालेल्या अमृतमय बोलाचा हा अक्षय कुंभ आहे. त्यात सर्वसामान्य लोकांसाठी सदाचार, सद्विचार व नीतीबोधाचा उपदेश आहे, तसेच अधिकारानुसार अबोलातून व्यक्त होणारा अमोल ज्ञानोपदेश आहे. श्रीसाईबाबांच्या लीलांचा बोध सामान्य बुद्धीला आकलन होणे शक्य नाही. श्रीसाईसच्चरितातील लीला, उपदेश, तत्त्व ह्यांचा बोध होण्याचा उपाय श्रीसाईबाबांनीच सांगून ठेवला आहे. तो आहे अनन्य-शरणागत-भावाचा व प्रेमयुक्त अंतःकरणाने केलेल्या भक्तीचा व सेवेचा.

'श्रीसाईसच्चरिता'तील ज्ञान, तत्त्वविचार, बोध, उपदेशांचे उद्‌गार प्रत्यक्ष परमेश्वराच्या मुखातून प्रगट झालेले उत्स्फूर्त उद्‌गार आहेत म्हणून ते भक्तांच्या हृदयाचा ठाव घेतात. पारायणामुळे सकाम-निष्काम त्याचा तात्काळ अनुभव-प्रचिती येते. डॉ. सहेली आपल्या 'Universal Master' ह्या ग्रंथात 'श्रीसाईसच्चरिता'विषयी जे म्हटले आहे ते मननीय आहे- ''His Life history written by 'Hemadpant' contains all the wisdom Vedas, the Upanisadas and Gita in the form of Simple steries and anecdotes. Reading them alone and following the advice therein one can reach the goal of Liberation without fail''.

कारण अवतारी सत्पुरुषांच्या वाणीत, शब्दात सामर्थ्य असते. हे मनीकुमार साहुकार स्पष्ट करतात, ''One Knows the truth uttlered by realised persons have been actually experienced by them''.

श्री साईबाबा महान योगी व तपस्वी होते. विरक्त, वैरागी होते. सर्वसंग परित्याग केलेले संन्यासी होते. संन्यासी धर्माचे धगधगीत वैराग्य त्यांचे ठायी होते. ते विरक्त, कठोर व्रती संन्यासी होते, पण त्यांच्या जीवनात रुक्षता व कठोरता नव्हती. तेथे दिसून येते ती त्यांची ऋजुता, दयार्द्रता, कोमलता व करुणा. गरीब, दुःखी जीवाविषयी करुणा व प्रेम. त्यांच्या उध्दाराची तळमळ. श्रीसाईबाबांच्या दैवी रुपाचा व अलौकिक विभूतीत्त्वाचा अनुभव अनेकांना आलेला आहे. भक्तांना त्यांच्या इष्टदैवताचे दर्शन त्यांचे ठायी झालेले आहे, असे प्रसंग 'श्रीसाईसच्चरित्रात' आहेत. त्यांचे जीवन अलौकिक व असामान्य असूनही त्यांचे दैनंदिन जीवनाकडे दृष्टिक्षेप टाकला तर कळते की असामान्य असूनही सामान्य जनात असामान्यपणे सामान्य होऊन आचरण करणारे व साधे जीवन जगणारे श्रीसाईबाबा म्हणजे ह्या युगाचा चमत्कार आहे.

श्रीसाईबाबा ज्ञानी होते. महान योगी व तपस्वी होते. पण त्यांनी उपदेश केला आहे 'भक्ती'चा. कलियुगासाठी हाच श्रेयस्कर मार्ग सांगितला आहे. भक्ती म्हणजे सेवा. भगवंताची व सर्वप्राणीमात्रात वसत असलेल्या परमेश्वराची निरपेक्ष, निष्काम वृत्तीने व प्रेमभावाने सेवा करणे. मानवता धर्माचे बीज त्यात आहे. महर्षी श्री अरबिंदो म्हणतात, ''अध्यात्मवादी मानवताधर्मच मनुष्याची भविष्याची आशा आहे. कारण उपकाराच्या भावनेने केलेली मानवसेवा अहंकार निर्माण करते. तर सर्वव्यापी चैतन्यामध्ये विश्वव्यापी आत्मा सर्वभूतांमध्ये पाहणे व समदृष्टीने विश्वाकडे पाहून, निष्काम होऊन, फलाशाविरहित पण प्रेमाने, ईश्वरभावी वृत्तीने केलेली मानवसेवाच माणसातील देवत्वाचा साक्षात्कार करून देऊ शकेल. हाच आजच्या युगाचा मानवधर्म आहे. 'सर्वांभूती परमेश्वर पाहणे' व समत्व पाहणे. तर स्वामी विवेकानंद ह्या विश्वव्यापी मानवधर्म व सेवा ह्याविषयी म्हणतात- ''मी माझ्या व्यक्तिगत मुक्तीची इच्छा केव्हाच सोडून दिली आहे. दुःखी कष्टी, दरिद्री जनांच्या सेवेकरता, त्यांच्या उद्धाराकरता पुन्हा पुन्हा जन्म घ्यावा लागला तरी हरकत नाही... त्यांच्यात वसत असलेल्या परमेश्वराची ती पूजा आहे''. तर पू. विनोबाजी सेवापरायण भक्तीविषयी म्हणतात, ''सेवापरायणता हाच भक्तीमार्गाचा आत्मा आहे. दुःखी, भुकेले, रोगजर्जर ह्यांच्या सेवेस लागणे हाच भक्तीचा सर्वोत्तम कार्यक्रम होय.''

परमेश्वरी अवताराला स्थल-कालाची मर्यादा नसली तरी 'अवतार-कार्य' देश, काल, परिस्थितीनुरूप घडत असते. आपल्या अवतार-कार्याविषयी त्यांनी म्हटले होते की हा त्यांचा अवतार 'ज्ञान'प्रदानाचा नसून मानवामध्ये परस्पर प्रेमभाव निर्माण करण्यासाठी आहे. प्रत्येक व्यक्तीच्या हृदयांतरी वसत



असलेल्या परमेश्वराची त्याला जाणीव करून देण्यासाठी आहे. त्यांच्या लीलांचे मर्म व उपदेशाचे सार मानवातील चैतन्याला जाग आणणे हे आहे. भक्तीच्या हांकेने जागृत झालेले चैतन्यच मग तुम्हाला सर्वांभूती परमेश्वर पाहण्यास शिकवील. त्यासाठी तुम्ही सर्वांशी समभाव ठेवून प्रेमाने वागा. कोणालाही कठोर वचन बोलून दुखवू नका. त्याने मला वेदना होतात; असे ते म्हणत. कोणाची निंदा, द्वेष, मत्सर करु नका. नेहमी सत्य बोला. अशी साधी शिकवण देत. समाज, देशाच्या उन्नत्तीकरता व्यक्तीचा अशा तऱ्हेने विकास होणे आवश्यक आहे. प्रेम, भक्ती, सेवा ह्या त्रयीत 'मानवता धर्मा'चे बीजारोपण आहे. शांती व सुखी, समृद्ध असे मानवाचे सहजीवनाचे व एकात्मतेचे उज्ज्वल भविष्य ह्यातून साकार होणार आहे.

मानवताधर्म आजचा युगधर्म आहे. भक्ती सोपान आहे. ती कशी कराल ? ''माझी सेवा, माझे भजन । अनन्यपणे मजशरण । तो होय मद्रूप जाण । भगवंत वचन भागवती'' पुढे सांगतात, ''साई, साई नित्य म्हणाल । सात समुद्र करीन न्याहाल । या बोला विश्वास ठेवाल । पावाल कल्याण निश्चये ॥ (सा.स.१३:१२) परमेश्वरप्राप्तीचा उपाय एकच,'' करिता माझिया कथांचे श्रवण । तयांचा मी नित्यांकित । ये अर्थी न व्हावे शंकीत । इतरत्र अप्राप्त मी सदा ॥'' पण ह्या भक्तीत तुझा प्रेमभाव असू दे. भगवान श्रीकृष्णांनी गीतेत सांगितले आहे, ''पत्र वा पुष्प जो प्रेमे फल वा जल दे मज । ते त्या पवित्र भक्तांचे अर्पिले खाय मी सुखे ॥ ईश्वराविषयी उत्कट प्रेम असल्याशिवाय असा भाव मनात निर्माण होत नाही. तो सर्वाठायी सारखा नसतो. पूर्वजन्माच्या पुण्याईने ईश्वराप्रती प्रीती, ओढ निर्माण होते. ईश्वराविषयी श्रद्धा त्याच्या अंतःकरणात मूळातच असते. हा पूर्वजन्मीचा संस्कार त्याला संतसहवासाचा लाभ करून देतो व भक्तीमार्गाकडे घेऊन जातो. श्रीसाईबाबांचे बोल स्पष्ट आहेत, ''पाप जयाचे विलया गेले । ऐसे जे पुण्यात्मे वहिले । तेचि माझ्या भजनी लागले । खूण लाधले ते माझी ॥'' (सा.स.१३:११) अशा भक्तांची जबाबदारी मग सद्गुरु-परमेश्वर स्वतः स्वीकारतात. पुढील आध्यात्मिक प्रगतीचा मार्ग दाखवतात. ''योगक्षेमं वहाम्यहं'' ह्या भगवान श्रीकृष्णांच्या वचनाप्रमाणे श्रीसाईबाबा अशा अनन्य भक्तांना आश्वासन देतात की, ''मज भजती जे अनन्यपणे । सेवित नित्याभियुक्त मने । तयाचा योगक्षेम

चालविणे। ब्रीद हे जाणे मी माझे ॥(६:३४).

भक्तीकरता चित्त निर्मल हवे. मन व बुद्धीचे मालिन्य दूर करण्याकरता श्रीसाईबाबा निष्काम कर्माचा उपदेश करताना म्हणतात ''मल, विक्षेप, आणि आवरण। ऐसी त्रिदोषी अंतःकरण। निष्काम कर्मे मल निर्मुलन। विक्षेप-क्षालन उपासना॥'' (१६.१६७) पुढे म्हणतात, ''स्वकर्म आणि उपासना करिता। परिपक्वता येते कर्त्याचे चित्ता। मल-विक्षेप निर्मल होता। आवरण शेषता राहते'' ॥१६८॥ श्रीसाईबाबांनी निष्काम कर्मयोग सांगितला आहे. तसेच उपासनेचे महत्त्व व त्यात सातत्य हवे, म्हणून त्यांनी त्याबरोबर 'श्रद्धा व सबुरी'चा मंत्र दिला आहे. श्रद्धेमध्ये भक्तीचे बीज आहे, तर परमेश्वराचा कृपा-प्रसाद लाभण्यास सबुरी हवी.

प्रापंचिकांना भक्तीचा उपदेश करताना म्हणतात की तुमची रोजची व्यावहारिक कर्तव्ये जरुर करा, ती सोडण्याची गरज नाही. फक्त ती मला स्मरुन, निष्काम वृत्तीने करुन मला अर्पण करीत जा. प्राप्त कर्तव्ये ईश्वराची इच्छा समजून करा. कर्तेपणा घेऊ नका. निरहंकारी व्हा. ईश्वराला प्रेम-भावाने, शरणागत होऊन त्याचे सतत स्मरण, भजन करा. अशा भक्ताचे उद्धरण हे माझे ब्रीद आहे. ''जे मजलागी अनन्य शरण। विश्वास युक्त करी भजन। माझे चिंतन, माझे स्मरण। तयाचे उद्धरण ब्रीद माझे। माझे नाम माझी भक्ति'' ॥ पण बाबांची खंत आहे, ''ऐसी सोपी सुलभ भक्ती। तरिही अवघे ती का न करती।''


भक्तीचे स्वरूप व्यापक आहे. त्यातील मर्म व अर्थ कळला तर साधकाचा विश्वास दृढ होऊन जलद प्रगती होईल.

'भक्ती' शब्दाचा वास्तविक अर्थ आहे सेवा. सेवार्थक भज् धातूपासून त्याला 'क्तिन्' प्रत्यय लावून भक्ती शब्द झाला आहे. भज् म्हणजे सेवा, म्हणून प्रभुसेवा हीच भक्ती असा पंडित अर्थ लावतात व सेवा हेच भक्तीचे प्रमुख साधन मानतात. 'वाहून टाकणे' असाही एक अर्थ आहे. ह्या अर्थाने ईश्वरचरणी स्वतःला वाहून घेणे, विलीन करणे म्हणजे 'भक्ती' होय. 'भज् सेवायाम्' याचा अर्थ सर्वसामान्यपणे असा आहे- 'अनुरागपूर्ण, आसक्ती व स्वेच्छेने केलेली सेवा. 'क्ती'चा अर्थ आहे प्रेम. परमेश्वराची प्रेमपूर्वक केलेली सेवा वा उपासना म्हणजे भक्ती. भक्तीचा मूलार्थ आहे- सगुण ईश्वराची पूजा करणे, प्रणामादी प्रकाराने सेवा करणे. भक्ताच्या मनोवृत्तीचे केंद्र फक्त भगवान असेल, उद्देश केवळ भगवद्प्राप्ती असेल. अंतरी फक्त भगवद्प्रीती असेल तर त्या अवस्थेला 'भक्ती' अशी संज्ञा आहे. निश्चय करणारी बुद्धी व संकल्प-विकल्प करणारे मन ही दोन्ही माझ्यावरील प्रेमाने भरून जाणे हीच भक्ती असे भगवंतांनी म्हटले आहे. भक्त व भक्ती आणि भगवान व गुरु एकाच परमतत्त्वाच्या स्थिती आहेत.

अध्यात्माच्या वाटचालीत निर्गुणाला-चराचरात भरलेल्या परमेश्वराला जाणणे हे साध्य तसे नरदेहाचे सार्थक आहे असे म्हटले आहे. तेथवर पोहचल्याशिवाय अध्यात्म-विचार पूर्ण होत नाही. ह्या निर्गुणाच्या ज्ञानासाठी सगुण भक्तीसारखा दुसरा उत्तम मार्ग नाही. दैनंदिन जीवनातील आपली प्राप्त कर्तव्ये निष्काम वृत्तीने व निस्वार्थ बुद्धीने पार पाडणे ही भक्तीची पहिली पायरी. सदाचार, सद्भावना, प्रेम, समभाव, इत्यादी गुण अशा सप्रवृत्त माणसांच्या ठिकाणी प्रामुख्याने दिसतात. पूर्वसंस्कारामुळे व उपजत ईश्वरीय प्रेमाच्या ओढीने भक्तीकडे वळतात. अध्यात्माच्या, परमार्थाच्या मार्गाला लागतात.

गुरुदेव रानडे चार प्रवृत्तींचा-प्रेरणांचा उल्लेख करतात. त्यांच्या मते ''आपले जीवन उज्ज्वल करण्यासाठी व पारंपारिक ध्येय संपादण्यासाठी परमेश्वराची प्रार्थना करण्याची अनवरत प्रेरणा ही परमार्थास लागण्याची पहिली प्रवृत्ती आहे. दुसरी प्रवृत्ती काव्यमय व काल्पनिक आहे. इंद्रियजन्य ज्ञानाने मनुष्य फसतो व नाशही पावतो, हा अनुभव म्हणजे परमार्थास लागणारी तिसरी अंतस्थ प्रवृत्ती होय. इंद्रियांवर जय मिळवायचा व त्याचा योग्य व श्रेष्ठ कार्याकडे उपयोग करावयाचा या इच्छेमुळे मनुष्य परमार्थाकडे वळतो. 'वैफल्याची भावना' ही चौथी प्रवृत्ती होय.''

ह्या प्रवृत्ती बहुधा पूर्वजन्मीच्या संस्कारावर अवलंबून असतात म्हणून सच्छिल, सदाचारी, सत्प्रवृत्त व सात्त्विक प्रवृत्तीची माणसे परमेश्वराकडे सहज व लवकर ओढली जातात. तामसी वृत्तीची माणसे स्वार्थी बुद्धीमुळे अध्यात्माकडे वळतात तर भौतिक व विषयांत सारसर्वस्व व सुख मानणारे राजस वृत्तीचे लोक दुःखात, संकटात, आर्थिक लाभासाठी परमेश्वराची उपासना करतील, त्यांची उपासना दुःख, संकट निवारणापुरतीच असते. विफलतेने ग्रासलेले लोकही परमार्थाकडे वळताना दिसतात; पण त्यांचे ते वैराग्य क्षणैक, म्हणजे मर्कट वैराग्य असते. अध्यात्म शास्त्र व भक्तिशास्त्राची त्यातील तत्वबोधाची निर्मिती अशा वैफल्यग्रस्त लोकांकडून झालेली नाही हे ऋषीमुनी व आचार्यांच्या चरित्रवाचनाने कळून येते. पू. मामासाहेब दांडेकर ह्यांनी हा विचार सुंदर रीतीने सांगितला आहे. ते म्हणतात, ''अध्यात्म शास्त्राचा उगम मनुष्याच्या ठिकाणी असणारी जी चौकस बुद्धी तिच्यात आहे. ग्रीक तत्ववेत्ता प्लेटो म्हणतो, ''Philosophy is the child of wonder''



अंतःकरणात जिज्ञासा नसेल तर मनुष्याच्या समोर घडणाऱ्या गोष्टींचा तो विचार करणार नाही. अध्यात्म शास्त्राचा उगम प्रपंचात अपयश व तज्जन्यसंसाराविषयी वीट, निरुत्साह यात आहे, हे अर्धवट सत्य आहे. प्रपंचात धक्के बसले म्हणजे मनुष्य 'आपल्या हातात काय आहे ?' 'करणारी शक्ती वेगळी आहे' अशी भाषा बोलू लागतो हे खरे, पण हे मर्कट वैराग्य आहे. अध्यात्म शास्त्राचा, तत्वज्ञानाचा उगम अशा विटक्या मनात निश्चितच नाही. ज्यांनी ज्यांनी आत्मविचार केला ते काही म्हातारे, विधूर, मूल मेलेले असे लोक नव्हते. प्रपंचात दुःखाचे टोले बसले म्हणजे मनुष्य आत्मविचाराकडे वळतो. त्याला त्या गोष्टीची जाणीव होते एवढेच. शास्त्र उत्पन्न होण्यास हा अनुभव अनन्यसाधारण नाही. कारण या दुःखाच्या अनुभवात तत्वज्ञान जर उगम पावत असेल तर रेसला जाणारे शेकडो लखपती व भिक्षापती झालेले हजारो लखपती तत्वज्ञ बनतील.''

अध्यात्म, परमार्थ, भक्ती, प्रार्थना ह्या मानवाच्या आंतरिक ओढी आहेत. अंतरात्म्याचा शोध घेण्याचा ध्यास लागलो, मन आत्मसंमुख करून परमेश्वराचे भजन, कीर्तन, श्रवण, मनन, पूजन करण्याची मनाची प्रवृत्ती होते. भक्तीचा असा अंतःकरणात सहजपणे उद्‌भव होतो.

कांही लोकांच्या मते भक्तिमार्गाचा प्रारंभ भीतीतून झाला आहे. पण ते खरे नाही. भयापोटी केलेली प्रार्थना त्या क्षणापुरती किंवा संकट टळेपर्यंत असते, अथवा फलप्राप्ती होईपर्यंत असते. सर्वसाधारण व प्रचलित भक्तीचे स्वरूप असे असले तरी भक्तीचा उगम भीती नव्हे तर प्रीती आहे. परमेश्वराला भक्त आळवतात ते माऊली म्हणून. दुखले-खुपले की माणूस आईला हांक मारतो तो आईवरील प्रेमामुळे व विश्वासामुळे. पू. विनोबाजी हे मत स्पष्ट करताना म्हणतात, ''भक्तीचा उद्‌गम भीतीतून नव्हे तर प्रीतीतून झाला आहे, अशी माझी धारणा आहे. भीती मनुष्यासाठी जितकी स्वाभाविक आहे, त्याहून प्रीती कितीतरी जास्त स्वाभाविक आहे. मनुष्य व इतर प्राणी दोघांनाही भीती वाटते, पण मनुष्याला भीतीपूर्वी प्रीतीचा अनुभव येतो. आपण पाहतो की जन्मल्यानंतर लगेचच प्रत्येक प्राण्याला आईचे प्रेम मिळते. त्यांचा पहिला अनुभव प्रीतीचा असतो. भीतीचा अनुभव नंतर येतो. भक्तीची सर्वात जुनी स्तोत्रे मी वाचली, त्यात ईश्वराला माता-पिता म्हटले आहे. भक्तिमार्गात ईश्वराच्या अनंत गुणात काही गुण असेही असतात, जे पचनी पडत नाहीत, भयावह वाटतात. मात्र प्राचीनकाळी भक्तीचा आरंभ भयातून नव्हे, तर प्रेमातून झाला, हे निश्चित आहे.'' मुलाला आईची ओढ ही अशी स्वाभाविक असते तशीच भक्ताची ईश्वराला भेटण्याची ओढ आंतरिक आहे.

भक्त ईश्वराकडे माता म्हणूनच बघतो. त्याला काहीही हवेसे वाटले अथवा काही त्रास झाला की तो ईश्वररुप मातेकडे धांव घेतो आणि मातेला हेच हवे असते. तिला आपल्या हृदयातील प्रेम सारखे प्रकट करावेसे वाटत असते. श्रीकृष्ण परमहंस खेळण्यात दंग असलेल्या मुलाचे उदाहरण देत. मुल खेळत असले की त्याला कसलेच भान नसते. खेळण्यातच ते रंगून जाते. एकदम त्याला आईची आठवण होते. मग ते सर्व खेळणी दूर करून आईसाठी आक्रोश करू लागते. त्याला फक्त आई हवी असते. आईसुद्धा मग धांवत येऊन प्रेमाने कुरवाळून उचलून घेते. मग ते शांत होते. ही मातेची ओढ म्हणजे भक्ती, मातेला मारलेली हांक आहे. भक्त मातेकडे धांव घेतो त्याचे कारण मातृविषयक प्रेम माणसाच्या ठिकाणी स्वभावतः उत्कट असते, आणि आम्हाला जगात भटकंती करून कंटाळा आला म्हणजे आम्ही प्रेमामुळे घराकडे आणि मातेकडे धाव घेतो. मातेच्या जवळ बसण्यात खरा आनंद मिळतो. देव भोळ्या-भाबड्या भक्तांचा माता-पिता सर्वस्व होतो.


भक्ती ही मानवाची आंतरिक ओढ आहे. आंतरिक प्रेरणा आहे. 'बीजाम्नध्ये जसा वृक्ष' तसेच प्रत्येक प्राण्यात अनंतत्व साठवलेले आहे. त्याचा शोध घेण्याचे अनंत मार्ग त्याने शोधून काढले आहेत. ह्या रहस्याचे शोध घेणे हे नरदेहाचे 'लक्ष्य' आहे व सार्थक आहे. मानवाची ही उत्तुंग भरारी, अनंताकडे घेतलेली झेप, त्याच्या अपूर्णतेतून निर्माण झाली. भक्ती हे त्याचे एक साधन आहे. ईश्वराचे रहस्यमय रुप प्रकट करणारे शास्त्र आहे. इतर शास्त्रांप्रमाणेच त्यात कष्ट आहेत, अभ्यास आहे, प्रयत्न आहेत. सुखदुःखापासून संकटा-पासूनची ही पळवाट नसून तो शुरांचा मार्ग म्हटला गेला आहे. जीवनात येणारी सुख-दुःखे, संकटे यांचा त्यात स्वीकार असतो. कष्ट 'तप' होते. परमेश्वरावरील प्रेमाने, त्याची इच्छा म्हणून स्वीकारतो. त्यामुळे कष्टातही त्याला निर्भेळ आनंदच मिळत असतो. त्याचे फल म्हणजे ईश्वरी कृपाप्रसाद.

भक्ती हा मनाचा भाव किंवा वृत्ती आहे. मनोवैज्ञानिक मनाच्या तीन वृत्ती मानतात-ज्ञान, भावना व क्रिया. ह्यांचे वैशिष्ट्य हे की कोणत्याही मानसिक अवस्थेत तिन्ही वृत्तींचा सहयोग असतो. त्या एकमेकांना सहाय्यभूत असतात. कोणा एका वृत्तीचे वर्चस्व असले की त्या वृत्तीच्या वर्चस्वाखाली इतर दोन वृत्ती समजुतदारपणे काम करतात. उदाहरणार्थ 'मीरा'ची भजने ऐकताना 'भावना' (वृत्ती) प्रधान असते, परंतु गाण्याचा अर्थबोध होण्यासाठी ज्ञान व त्या अनुषंगाने शारीरिक क्रिया आपोआप घडतात. खेळाचे उदाहरण घेतले तर त्यात 'क्रिया' मुख्य, पण 'लक्ष्या'चे ज्ञान ठेवावे लागते व तशा क्रिया कराव्या लागतात. तर 'गीते'वरील विद्वानाचे व्याख्यान ऐकताना 'ज्ञानवृत्ती' प्रधान असते. परंतु व्याख्यान लक्षपूर्वक ऐकणे व श्रवणाचा आनंद उपभोगणे ह्यासाठी दोन्ही वृत्ती एकमेकांच्या सतत संपर्कात असतात.

भक्तीचे स्वरुप भावनिक आहे. तेव्हा तेथे भावना ही प्रमुख वृत्ती आहे. परंतु भावनेत 'भावनान्तर्गत' दुसऱ्या शाखा अंर्तभूत आहेत. त्या तीन प्रकारात मोडतात- १) देहात्मक- भूक, तहान, उष्णता, सर्दी इत्यादी (२) दुसरी आवेशात्मक- ह्यामध्ये सहानुभूती, विषाद, भय, क्रोध इत्यादींचा समावेश होतो. (३) तिसरी रसात्मक- म्हणजे प्रेम, श्रद्धा वगैरे भावना त्यात अंतर्भूत असतात.

भक्तीमध्ये भक्त नाचतो, गातो, रडतो, हसतो ह्याचे कारण प्रकृतीचा नियम. मनोमय कोशामध्ये विकार निर्माण झाल्यावर त्याची प्रतिक्रिया अन्नमय कोशाद्वारे स्थूल शरीरावर लक्षणाद्वारे प्रगट होते. कारण 'प्रकृतिंयान्ति भूतानि' प्रत्येक रसामध्ये Sentiments, आवेश (emotions) अव्यक्त रुपात असतात व संधी मिळाल्यावर त्यांचे प्रगटीकरण होते. त्यामुळे ज्या अवस्थेत जीवाचे मन, वाणी, देह भगवन्मय होऊन जातो, सतत त्याचेच भजन, स्मरण, चिन्तन निरंतर होत राहते, वाणी सदोदित भगवंताचे गुण गात असते आणि देह परमेश्वराच्या सान्निध्यात राहत असतो हेच भगवंताचे भजन. काया-वाचा-मने तो भगवद्मय होऊन त्या आनंदात त्याला बाह्य जगताचा विसर पडतो. आत्मस्वरूपी तल्लीन होऊन जातो.

भक्तीचा अर्थच असा की भक्तात असा दृढ भाव असतो की ईश्वरी योजनेत येणारी सुख-दुःखे भक्त ईश्वरीप्रसाद म्हणून स्वीकारतो. त्यामुळे त्याच्या मनाची समता ढळत नाही. म्हणून ईश्वरावरील प्रेमभाव महत्त्वाचा आहे. भाव तेथे देव आहे. पू. विमलाजी साधकाच्या दृढ भावाविषयी म्हणतात, ''संसारी प्रथम सत्संगी बनतो. नंतर हजारातून एखाद्याला साधक बनण्याची प्रेरणा होते. संसारात कंटाळलेले, विषाद उत्पन्न झाला, अपयश आले, थकून गेले म्हणून अध्यात्माकडे वळले, संतांकडे गेले, पण त्यांत जर 'भाव' नसेल तर उत्कटता येणार नाही. भाव शब्दाचा धात्वर्थ असणे असा आहे. 'भूसत्तायाम्'. अर्थात अभाव म्हणजे नसणे. देवाचा भाव (अस्तित्व) मानतो तो आस्तिक. स्तोत्रे, देवपूजा, नमस्कार इत्यादी भक्तीची अंगे सर्वांना माहीत असतात, पण तेथे कमी पडतो तो भाव. भावावाचून भक्ती म्हणजे नुसती कसरत होय. श्रीज्ञानेश्वर माऊली भावाचा गौरव करताना म्हणतात, ''भावेवीण भक्ति। भक्तिवीण मुक्ति। बळेवीण शक्ति। बोलू नये.'' म्हणून मूर्तीपूजेत



त्या मूर्तीमधे देवाच्या अस्तित्वाच्या भावाचा अभ्यास व्हावयास हवा.

असे म्हटले आहे की, सत्ययुगात ध्यानाद्वारे, त्रेतायुगात यज्ञाद्वारे, द्वापारयुगात पूजा-अर्चनाद्वारे जे फळ मिळते तेच कलियुगात केवळ हरिकीर्तनाने मिळते. संसारी माणसांना भक्ती हेच सुलभ व सर्वश्रेष्ठ साधन आहे. शास्त्रात संसारी जीवांकरिता विष्णुसहस्रनाम पठण, नामजप, प्राकृतांकरिता मूर्तीपूजन व संन्यासाकरता ध्यान सांगितले आहे. आणि अनन्य भक्तांसाठी प्रेमपूर्वक केलेली भक्ती सांगितली आहे. भगवंतांनी आश्वासन दिले आहे की ह्या चार साधनांनी मी प्रसन्न होऊन त्यांना बुद्धियोग देतो व सायुज्य मोक्षाच्या तीरावर आणून सोडतो.

उपनिषद साहित्यात भक्तीला उपासना म्हटले आहे. उपनिषदांचा अर्थच उपासना असा आहे. 'उप' म्हणजे जवळ व 'आसन' म्हणजे बसणे. देवाच्या जवळ जाऊन बसण्याची क्रिया किंवा युक्ती हिला उपासना म्हटले आहे. अद्वैत संप्रदायात उपासनेचा अर्थ सांगताना म्हटले आहे, ''सगुण ब्रह्यामधे मन लावणे, विलीन करणे म्हणजे उपासना'', चित्ताची एकाग्रता तिचे प्रयोजन मानले गेले आहे. सर्वसामान्य माणसे पार्थिव पूजा करतात ती व 'मानसपूजा' सुद्धा उपासनेचा भाग आहे. उपासना म्हणजे उप+आसना. उप म्हणजे जवळ व आसना म्हणजे स्थिती. तेव्हा कोणत्याही व्यक्तीच्या सान्निध्यातील स्थितीला उपासना म्हटले आहे. परमेश्वराजवळ स्थित होऊन प्रेमपूर्वक व भक्तीने त्याची सेवा करणे, शुश्रूषा करणे म्हणजे उपासना. मूर्ती, वृक्ष, गुरु, माता-पिता इत्यादिकांच्या ठिकाणी ईश्वरभाव ठेवून त्यांची सेवा, पूजा-अर्चा करणे, आणि ईश्वर सर्वत्र आहे, सर्वांच्या हृदयांतरी स्थित आहे, ही भावना ठेवून केलेली सेवा म्हणजे उपासना, आचार्यांनी उपासनेचा अर्थ पूजा, प्रणाम इत्यादी द्वारा सेवा करणे असे सांगितला आहे- ''उपासते अर्चनवन्दनादिभिः सेवन्ते।'' सुर्यादी भौतिक पदार्थांवर त्यांचे ठिकाणी ब्रह्मभावना करणे म्हणजे उपासना होय. उपासना भावनेवर निर्भर असते, तर भक्ती ज्ञानावर. वस्तू जशी आहे तशी मानणे, स्वीकारणे त्याला येथे ज्ञान म्हटले आहे. सगुण ईश्वराची पूजा, प्रणामादी प्रकारे सेवा करणे म्हणजे भक्ती.

उपासनेने चित्ताची चंचलता क्षीण होऊन सत्त्वगुणाची वाढ होते. त्यासाठी अगोदर कर्मकांडाप्रमाणे चित्तशुद्धी झाल्यानंतर तो उपासनाकांडाचा अधिकारी होतो. मनुष्य त्रिगुणात्मक आहे, म्हणून वेदात कर्मकांड, उपासनाकांड व ज्ञानकांड सांगितले आहेत. तमोगुणी लोकांसाठी कर्मकांड तर रजोगुणी लोकांसाठी उपासनाकांड सांगितला आहे. ज्ञानकांड सत्त्वगुणी लोकांसाठी सांगितला आहे.

तसे पाहिले तर उपासना व भक्तीच्या सीमारेषा आंखता येणार नाहीत. कारण त्या एकमेकात चिकटलेल्या आहेत. त्यामुळे सर्वसामान्य माणसे उपासनेलाच भक्ती समजतात. भक्ती व उपासना ह्यांत आंतरिक भेद असला तरी दोहोंमध्ये एक साम्य आहे ते भावनेचे. उपासनेलाच काही ठिकाणी भक्ती म्हणून उल्लेख करतात. अशी भक्ती उत्कट झाली की ज्ञानाचा उगम होतो, म्हणून तुकाराम महाराज म्हणतात, ''भक्ति ज्ञानाची माऊली''. ज्ञान हे वस्तुतंत्र व उपासना ही कर्तृतंत्र, म्हणजे कर्त्याच्या आधीन व त्याच्या भावनेवर, इच्छेवर अवलंबून असते. ती करणे किंवा न करणे, कशीतरी उरकणे हे साधकाच्या इच्छेप्रमाणे होते. भक्ती क्रियारुप नसते म्हणून ती उपासना नाही. उपासनेत निर्गुणोपासना व सगुणोपासना असे दोन भेद आहेत. अखंड ब्रह्म मीच आहे अशी निरंतर भावना ठेवणे ही निर्गुणोपासना, हिलाच 'अहंग्रहोपासना' म्हटले आहे. सगुणोपासनेला 'प्रतिकोपासना' म्हणतात. उपासनेचा मुख्य फायदा म्हणजे एकाग्रता वाढवण्यास मदत होते. एकाग्रता म्हणजे ज्या दैवताची आपण उपासना करतो त्याव्यतिरिक्त दुसरा विचार मनात येता कामा नये. उपासक आपल्या वाट्याला आलेली विहीत कर्मे कर्तव्यबुद्धीने व ईश्वराची इच्छा समजून, ईश्वरावरील अनुरागाने निष्काम वृत्तीने करतो. त्यामुळे त्याला ती कर्मे बंधनकारक होत नाहीत. चित्तशुद्धी होऊन तो नकळत उपासनेच्या अंतरंगात प्रवेश करतो. उपासनेत स्वतःला विसरतो. त्याच्या मनात ईश्वराविषयी प्रेम निर्माण होते. खऱ्या (परम) भक्तीचा आरंभ येथून होतो. त्याचे धर्माचरण ईश्वरावरील प्रेमापायी होते. उपासना यांत्रिक क्रिया किंवा अज्ञानी भक्ताप्रमाणे देव आपल्याला शिक्षा करील ह्या भयापोटी केलेले हे धर्माचरण नसते. तेथे असतो शुद्ध भाव, प्रेम व भक्ती.

भक्ती म्हणजे देवावरील नितान्त प्रेम. सर्वभावाने केलेली त्याची सेवा. भक्ती म्हणजे परमेश्वर भेटीची आत्यंतिक ओढ व तळमळ. भक्तीसूत्रकारांच्या मते मनोमन ईश्वरावर प्रेम करणे हीच भक्ती. देवर्षी नारदांनी परमात्म्यावरील आत्यंतिक प्रेमाला भक्ती म्हटले आहे. तर महर्षी शांडिल्यांनी ईश्वराप्रती अनुरागाला भक्ती म्हटले आहे. आपल्या सूत्रात ते भक्तीला 'सरांधन' म्हणतात. नाट्यपंचरात्रीत भक्तीसंबंधी वचन आहे की इंद्रियाद्वारा ईश्वराची केलेली सेवा म्हणजे भक्ती होय. ती सर्व उपाधीरहित असते. तसेच परमेश्वररुपी असल्याने निर्मळ असते. भक्तीच्या जलाने चित्तावरील रज-तमाचा मळ धुतला जातो. चित्तवृत्ती शांत व स्वच्छ होते. विरक्ती वाढते. सर्वस्व ईश्वरचरणी वाहून केलेल्या भक्तीने भक्त मुक्त होतो, पण एकनाथ महाराज म्हणतात, मुक्तीपेक्षा भक्ती श्रेष्ठ आहे.

भक्ती प्रेमरूप आहे तशीच ती श्रद्धा-विश्वासरुपीणी आहे. जेथे भक्ती तेथे प्रेम, तेथेच श्रद्धा व विश्वास. म्हटलेच आहे की, ''बिनु विश्वास भगति नहीं'' भक्ती जीवनाचे प्राणस्त्रोत आहे. वृक्षाचे पोषण पाणी व हवेने होते तसे माणसाचे चित्त भक्तीद्वारा बलसंपन्न होते.

भारतीय संस्कृतीच्या विकासात, उत्कर्षात व त्याबरोबर भारताची एकात्मता व अखंडता टिकविण्यासाठी, त्यात वाढ करणाऱ्या अनेक घटकांत भक्तीचा व तिचा प्रसार व प्रचार सार्वत्रिक करणाऱ्या संताचा वाटा उल्लेखनीय आहे. भारतीय धर्मविचारात परमेश्वरप्राप्तीचे दोन परंपरागत मार्ग सांगितले आहेत. एक कर्ममार्ग व दुसरा ज्ञानमार्ग. कर्म व ज्ञानमार्गाबरोबर भक्तिच्या समन्वयी मार्गाचा प्रभाव भारतीय जीवन पद्धतीवर झालेला स्पष्ट दिसून येतो. कर्मकांडापासून मुक्त असा हा भक्तिमार्ग भारताच्या कानाकोपऱ्यात पोचून सर्व थरांच्या लोकांत विसावला आहे.

वेदात पूर्व मीमांसेत कर्ममार्ग अर्थात प्रवृत्तीमार्ग सांगितला आहे. तर उत्तर मीमांसेत निवृत्तीमार्ग सांगितला आहे. त्यात विरोध नाही. दोन्ही मीमांसा एकमेकांशी संबंधित आहेत. कारण विधिवत कर्ममार्गाचे अनुसरण केल्याने निवृत्ती प्राप्त होण्यासाठी लागणारी चित्तशुद्धी होते. अशा चित्तशुद्ध झालेल्या व्यक्तीच महावाक्याचे श्रवण करण्यास समर्थ होतात. कर्ममार्ग आत्मप्राप्तीसाठी साधनरुप आहे. पहिल्या, म्हणजे कर्ममार्गानुसार ब्रह्मचर्याश्रमानंतर, गृहस्थाश्रमात प्रवेश केल्यावर मनुष्याने आपली यज्ञयागादी विहित कर्मे शास्त्रानुसार करून इहलोकी व परलोकी परमगती प्राप्त करून घ्यावी. हा झाला सामाजिक व्यवस्था टिकवणारा स्थिर आचार धर्म. दुसरा ज्ञानमार्ग सांगितला आहे. तो संन्यास धर्माचा पुरस्कर्ता आहे. ह्यात सत्याचा अनुभव घेण्याकरता व आपले इप्सित साध्य करुन घेण्याकरिता सर्व ऐहिक कर्मांचा त्याग करुन एकांतात तपस्या व साधना करण्याची आवश्यकता सांगितली आहे. अर्थात हा कठीण व कष्टसाध्य मार्ग नेमक्या व मोजक्या अधिकारी व्यक्तींसाठी आहे. बहुजन समाजाकरता पहिलाच मार्ग अनुसरण्यास सोपा म्हणून सांगितला आहे. समाजधारणेसाठीही त्याची उपयुक्तता निर्विवाद आहे, परंतु नंतरच्या काळात त्याचा समाजोन्मुखी, समाजोद्धारक व व्यक्तीचा आत्मोध्दार साधून देणारा मूळ हेतूच विसरला गेला. कर्मकांडाला विकृत स्वरूप येऊन त्याचे मूळ स्वरूपाला वेगळे वळण लागले. संधीसाधू, स्वार्थी, लोभी पुरोहित वर्गाने बंदिस्त केलेले ज्ञान कालौघात अभ्यासाभावी त्याला विकृत

स्वरुप येत गेले. लबाडी, अज्ञान ह्यामुळे त्याविरुद्धच्या झालेल्या बंडात तो मागे पडला. बुद्धधर्माच्या उत्कर्षाच्या काळात निवृत्ती मार्गाचा (संन्यासाचा) प्रसार झाला. नंतरच्या आचार्यांनी वैदिक धर्माचे पुनरुत्थान केले. त्याचे लुप्त झालेले सन्माननीय स्वरुप पुन्हा प्राप्त झाले. त्यानंतरच्या काळात म्हणजे बाराव्या शतकानंतर परमेश्वरप्राप्तीचा सोपा मार्ग म्हणून सर्वांसाठी त्याची दालने उघडली व थोड्या अवधित जनमानसावर, समाजातील सर्व धरात, तळागाळातील, लोकांवर त्याचा प्रभाव पडून त्याचा प्रसार व प्रचार झपाट्याने होत गेला-तो भक्तिमार्ग.

भक्तिमार्ग भावात्मक आहे. अभाव किंवा शून्यावर आरुढ होणे कठीण. उलट भावावर आरुढ होणे त्यामानाने तुलनेने सोपे असते. सर्वसाधारण लोकांना वाटत असते की आपल्या उपासनेचा, पूजेचा, भक्तीचा विषय आपणांहून भिन्न असावा. त्यामुळे सगुण ईश्वराचा मनाने लगेच स्वीकार होतो. त्याची भक्ती करण्यास सोपी जाते आणि सहजता येते. म्हणून अवतारी पुरुष, गुरु, देव इत्यादींची भावनिक गरज माणसाला असते. पूजा-अर्चा, भजन इत्यादीत तो सहज तन्मय होऊन जातो. ह्या प्राथमिक स्वरुपाच्या परंपरागत उपासनेमधून त्याला ईश्वराला जाणण्याची जिज्ञासा लागते. त्याच्या भेटीची, दर्शनाची ओढ त्याच्यात निर्माण होते. ही त्यांची आंतरिक ओढ, प्रार्थना व तद्रुप होऊन केलेली उपासना ह्याचे फळ म्हणून, प्रतिसाद म्हणून परमेश्वर भक्ताच्या इष्ट देवतेचे स्वरुप धारण करतो, किंवा सत्पुरुषाच्या रुपाने अप्रत्यक्षपणे मार्गदर्शन करतो. परमभक्तीसाठी मग आवश्यक असणारी साधना सद्गुरू त्याच्याकडून करुन घेतात.

खरा भक्त सतत अभ्यासाने, साधनेने, ध्यानाने स्वतःला भक्तियुक्त करत असतो. त्याची साधना आता फक्त भगवद् कृपा व्हावी ह्या एकाच हेतूने चालू असते. परमेश्वरप्राप्ती व्हावी ही अखंड तळमळ त्याला लागलेली असते. अशा खऱ्या भक्तीचा उदय हृदयात होतो. सदाचारासारखी ती एक आंतरिक स्थिती आहे. तीमध्ये भक्ताला परमेश्वराच्या स्वरुपाची ओळख पटून भक्त प्रेमाने त्याच्या सेवेतच मग्न होऊन जातो. त्याचा थोडासाही विवेक त्याला सहन होत नाही. ईश्वरावरील प्रेमाने त्याचे जीवन आता व्यापून गेलेले असते. ह्या प्रेममय भक्तीत भक्त आपल्या सर्वस्वाचा त्याग करतो. त्याचे प्रेमसर्वस्व ईश्वरच असतो. त्याची श्रद्धा, निष्ठा, विश्वास एकमेव परमेश्वर असते. त्याची एकच इच्छा असते की परमेश्वराने दर्शन द्यावे, दिवसरात्र त्याच्या सान्निध्यात राहावे. असा ध्यास त्याला लागलेला असतो. एकनिष्ठ भावाने ईश्वराचे गुणगाण, भजन, कीर्तन, पूजन-अर्चन, श्रवणादीत तो दंग होऊन जातो. बाह्य जगाचा त्याला विसर पडतो. त्याचे आत्मसमर्पण व शरणागत भाव अशाप्रकारे पराकोटीला गेलेला असतो. ही भगवद्प्राप्तीची खरी भक्ती सांगितली आहे. एकनाथ महाराज अशा भक्तीला सुळावरची पोळी ते म्हणतात, ''लोक भक्त म्हणवून घेण्यातच अभिमान मिरवतात, त्यात गौरव मानतात. परंतु खरी भक्ती दुर्लभ आहे. कारण भक्तितत्व तसे निगूढ आहे. वेदांनाही त्याचे आकलन होऊ शकले नाही. पुजारी, कीर्तनकार, जेव्हा उपचार म्हणून देवाचे सारे सोपस्कार करतात ती भक्ती कशी म्हणता येईल ? कारण ते देवाची नव्हे तर धनाची भक्ती करत असतात. संकटात केलेली प्रार्थना अथवा सकाम भक्तीला खऱ्या अर्थाने भक्ती म्हणता येणार नाही, अशी भक्ती वैधी भक्ती होय.''

अशी ही परमभक्ती सहज लाभणारी वा साध्य होणारी गोष्ट नव्हे, त्याला पूर्वसुकृत लागते. पूर्वपुण्याई लागते. भगवान म्हणतात ''यद्दच्छाया मत्कयादौ जात श्रद्धस्तुयः पुमान। न निर्विण्णो नातिसक्तो भक्तियोगोऽस्य सिद्धिदः ॥ (भा.११.२०.८) म्हणजे पूर्वजन्मीच्या सदाचारी वृत्तीमुळे ज्यांची माझी कथा श्रवण करण्यात, गोडी निर्माण होऊन माझ्यात श्रद्धाभाव जागृत झालेला आहे, विषयांची आवड मर्यादित आहे, त्यामधे ते लिप्त झालेले नाहीत, त्यामुळे त्यांच्यात विषयासक्ती नाही अशा लोकांसाठी भक्तियोग फलदायक आहे. अर्थात गृहस्थाश्रमी असून ज्यांच्यात ईश्वराप्रती अनुराग आहे, तोच भक्तिमार्ग अनुसरण्यास अधिकारी व्यक्ती होय. अशी ही भक्ती पूर्वपुण्याईचे फल आहे, ईश्वरी कृपा प्रसाद आहे. म्हणून म्हटले आहे की ज्ञान देता येते पण भक्ती देता येण्यासारखी गोष्ट नाही. कारण त्यात भगवद्प्रेम अभिप्रेत आहे.

परम भक्तीचा उदय भक्ताच्या हृदयात केवळ परमेश्वर कृपेनेच होतो. भगवद्प्राप्तीची साधने दुसरा सांगू शकतो, मुमुक्षू आपल्या प्रयत्नाने कर्म, उपासनाद्वारे ज्ञान प्राप्त करु शकतो, परंतु ईश्वरी कृपेशिवाय त्याला ईश्वराच्या प्रेमाचा लाभ होणार नाही. ईश्वरकृपेनेच साधनेला, उपासनेला, कर्माला यश येते. अनन्य शरणागत भक्तालाच ईश्वराचा कृपाप्रसाद मिळतो.

**(उत्तरार्ध पुढील अंकात)**

# बाबांची लीला

## 'श्री साईलीला'च्या जुन्या अंकातील शब्दधन

अमृतकलश

श्री साईबाबांचे पुढें एकनिष्ठ भक्त झालेले संतकवि श्रीदासगणू महाराज हे श्रीवामनशास्त्री इस्लामपूरकर यांचे शिष्य होते. 'मी काशीस जाऊन देह ठेवणार आहें' असे श्रीवामनशास्त्री यांनीं दासगणूंना सांगितलें होतें. पुढें ते काशीस जाण्यास निघाले त्यावेळीं 'दौंड येथे मला येऊन भेट' असा त्यांनीं आपल्या शिष्याला निरोप पाठविला. त्याप्रमाणें दासगणू आपल्या गुरूच्या दर्शनास गेले. शास्त्रीबुवांनीं त्यांना दौंडाहून परत जाऊं दिलें नाहीं. ते त्यांना भुसावळपर्यंत बरोबर घेऊन गेले. भुसावळहून पुढें जातांना शास्त्रीबुवांनीं दासगणूंना परत पाठविलें आणि त्यावेळीं दुःखी झालेल्या आपल्या शिष्याचे सांत्वन करीत म्हटलें, "वेड्यासारखें दुःख करूं नकोस. हा मुळीं मृत्युलोकच आहे. त्यांतूनहि मी नित्याचाच दुरावलों आहें अशी समजूत करून घेण्याचें कांहींच कारण नाही. दोनतीनदां शिरडीस गेला होतास ना ? श्रीसाईबाबा थोर विमूति आहेत. त्यांना माझेंच स्वरूप मान. आम्ही दोघे एकरूप आहोंत. तेच येथून तुला पुढें वेळोवेळी मार्ग दाखवितील."

त्याप्रमाणें श्रीदासगणू पुढें श्रीसाईबाबा यांना गुरुस्थानीं मानूं लागले. 'भक्तिसारामृत' या आपल्या ग्रंथांतील त्रेपन्नाव्या अध्यायाच्या शेवटी श्रीसाईबाबांना उद्देशून दासगणू म्हणतातः-

हे श्रीसाईसमर्था ।
तुझ्या पदीं ठेवून माथा ।
करितों विनंती हीच आतां ।
ती उदारपणें मान्य करा ॥

मी सकल संतांचा चरणरज ।
माझी राखा आपण लाज ।
तुम्ही भवाब्धीचें जहाज ।
हें म्यां पक्के जाणलें ॥

हीच विनंती साईनाथा ।
या वामनशास्त्र्यांच्या छात्रा ।
नको लोटूं कदा परता ।
बाबा दासगणूसी ॥

माझे गुरु मरून गेले ।
पोरकेंपणा मजला आलें ।
म्हणून पाहिजे सांभाळिलें ।
या पोरक्या गणूसी ॥

तुम्ही एकरूप अवघे संत ।
तुम्हांमाजी नसे द्वैत ।
तुम्ही वामनशास्त्री साक्षात् ।
आहांत बापा मजलागीं ॥

पण असें असलें तरी प्रथम प्रथम साईबाबांचा आणि त्यांचा जो परिचय झाला तो कांहीं ते सत्पुरुष आहेत आणि त्यांची कृपा संपादन झाली तर आपलें कल्याण होईल, अशा भावनेनें झाला नाहीं. श्री नानासाहेब चांदोरकर यांच्या आग्रहामुळें ते प्रथम शिरडीस गेले.

श्री. नानासाहेब कलेक्टर कचेरींत पुढें चिटणीस झाले होते. त्यांना तमाशाचा नाद असे. दासगणूंच्या लावण्या त्यांच्या रसिक मनाला फार आवडत. त्यावरून प्रारंभी त्यांची ओळख झाली. पुढें तर ते परस्परांतील उच्चनीच दर्जाचें अंतर विसरून एकमेकांचे जिवाभावाचे मित्र बनले. नानासाहेब चांदोरकर हे साईबाबांचे एकनिष्ठ भक्त होते. बाबांना ते प्रतिईश्वर मानीत. महिन्यांतून दोनतीनदां तरी शिरडीस बाबांच्या दर्शनास गेल्यावांचून त्यांना चैन पडत नसे. त्यांनीच 'गणपतराव ! अरे, एकदां तरी शिरडीस चल' असें सारखें पाठीस लागून श्रीदासगणूंना प्रथम शिरडीस नेलें. वरिष्ठ अधिकारावरील माणसाच्या इच्छेला अगदीच नकार देणें इष्ट नाहीं, याच भावनेनें सुमारें १८९६ साली प्रथम दासगणू शिरडीस साईबाबांच्या दर्शनाकरतां गेले. आरंभी श्रीसाईबाबांविषयीं दासगणूंना फारसा आदर वाटला नाहीं. केवळ बाह्यांगावर भुलणें वा लोकांच्या सांगण्यावर विश्वास ठेवून गतानुगतिक होणें, हें दासगणूंच्या स्वभावांतच नाही. त्यांना स्वतःला एखादी गोष्ट पटेल, अनुभवास येईल तरच ते ती मानीत. त्यांच्या निष्ठावंत श्रद्धेला बुद्धिवादाचें अधिष्ठान आहे. श्रीसाईबाबांशीं त्यांचा परिचय जसजसा वाढत गेला, त्यांच्या



त्रिकालज्ञानाचा प्रत्यय आला, तसतशी श्रीसाईबाबा ही अलौकिक विभूति आहे, याची साक्ष पटून बाबांच्या चरणीं दासगणूंची निष्ठा स्थिरावली. या निष्ठेला शेवटीं तर-

शिरडी माझें पंढरपुर ।
साईबाबा रमावर ।
शुद्ध भक्ति चंद्रभागा ।
भाव पुंडलीक जागा ।।

असें मानण्याइतकें उज्ज्वल स्वरूप प्राप्त झालें.

श्रीसाईबाबांनीं एक दिवस नानासाहेब चांदोरकरांना म्हटलें, ''नाना सगळ्या संतमंडळींना जेवायला बोलीव. सगळी सिद्धता चांगली कर. आणि आपल्या या गणूवर सर्व संतांना बोलावण्याचें काम सोपीव. तो आणील बोलावून सगळ्यांना. एवढं कर बरं का गणू तुझें लई कल्याण होईल !'' याचा अभिप्रेत गूढार्थ असा की, संतकवि महीपतीनें आपल्या भक्तलीलामृतादि ओवीबद्ध ग्रंथांतून संतांचीं चरित्रें काव्यमय भाषेंत गायिलीं आहेत, तशीं दासगणूंनी वर्णावीं. ही आज्ञा दासगणूंनीं मानली. त्यांनी संत चरित्रें लिहिण्यास प्रारंभ केला.

श्रीसाईबाबांच्या आज्ञेप्रमाणें संतचरित्रें लिहिण्यास प्रारंभ झाल्यानंतर श्रीदासगणू बाबांच्या दर्शनाकरतां बरेच वेळां जात असत. श्रीसाईबाबांविषयीं त्यांच्या मनांत आतां आदरभाव उत्पन्न झाला होता. श्रीसाईबाबांचेंहि दासगणूंवर फार प्रेम होतें. पुष्कळ लोकांवर बाबा कधीं कधीं फार रागावत, शिव्या देत, मारहाण करीत. दासगणूंवर मात्र ते रागावल्याचें कोणी कधीं पाहिलें नाहीं. बाबांनीं नरसिंहाचा अवतार धारण केला की इतरांचा थरकांप होई. मशिदीची पायरी चढण्याचाहि कोणाला धीर होत नसे. दासगणू तशाहि स्थितींत जवळ जाऊन नमस्कार करीत. बाबांनीं यांना पाहिलें की त्यांचा राग नाहींसा होई व ते यांच्याशीं हितगुज करूं लागत. 'नोकरी सोडून दे रे गणू' असा सारखा आग्रह दासगणूंना करण्यास साईबाबांनी सुरवात केली होती. दासगणू त्यांच्या दर्शनास आले की ते म्हणत, 'गणू, नोकरी सोडून दे. अरे, आपण बूट पुसायला जन्मलो काय ? आपण कोणाचे चाकर होऊ नयें.'

दासगणू म्हणत, 'बाबा, मला कुणाचा आधार नाही. ही नोकरी आहे म्हणून दोन प्रहरला गोळाभर अन्नतरी खायला मिळतें. मी आता फौजदारीच्या परीक्षेला बसलों आहे. यश मिळालें तर बढती होईल. तेव्हां 'परीक्षेत उत्तीर्ण होशील' असा आशीर्वाद देण्याचें सोडून 'नोकरी सोड' असा भलताच आग्रह कां बाबा ?'

'तूं कशाचा परीक्षेंत उतरतोस ? माझें ऐक. नोकरी सोड. देवाला तुझी लई काळजी आहे.'



दासगणूंनी हें बोलणें मनावर घेतलें नाही. फौजदारीच्या परीक्षेच्या अभ्यासासाठी असलेल्या पोलीस ॲक्टमधील विषय त्यांनीं कविताबद्ध केला. त्यामुळें पाठ करणें सोपें जाऊन सर्व विद्यार्थ्यांत दासगणूंचा क्रम पुष्कळ वर आला. अर्थातच दासगणू श्री. चांदोरकरांकडे जाऊन म्हणाले,

'अहो नानासाहेब, मी नुसता उत्तीर्ण नव्हे तर पहिल्या वर्गात आलों. बाबा तर म्हणाले होते पडशील म्हणून.'

पुढें बाबांनी यावर स्पष्टीकरण केलें - 'कागदावर पास होण्यांत काय अर्थ ? फौजदारी मिळवशील तर खरा ! माझं ऐक. नको या मोहांत पडूं. नोकरी सोड गणू !'

श्री. चांदोरकर म्हणाले, ''गणपतराव, बाबांची आज्ञा मोडूं नको. तुझा जेवढा पगार आहे, तितके पैसे मी देईन तुला प्रत्येक महिन्याला. मग तर झालें ?''

तरी दासगणूंनीं तिकडे दुर्लक्ष केलें. इतकेंच नव्हे तर ते शिरडीस जाण्याचें टाळूं लागले. एकदां गुन्ह्याच्या तपासाकरतां जात असतांना शिरडीवरून रस्ता होता. पण तो चुकवून आडरस्त्यानें जात असतांहि बाबांची अकस्मात् भेट झाली. ते म्हणाले, ''गणू ! किती तोंड चुकविशील ? बऱ्या बोलानें नोकरी सोडून दे. ऐकले नाहींस तर मागाहून पस्तावशील बरें !''

बाबांच्या या बोलण्यावर कांहींच उत्तर न देतां त्यांना नमस्कार करून दासगणू पुढें निघून गेले.

या गोष्टीला काही महिने लोटले. बाबांचें बोलणें स्मरणांत राहिलें नाही. पण एकदा कठीण प्रसंग ओढवला. श्रीनरसिंगजी महाराजांची चरित्रविषयक माहिती मिळविण्याकरतां दासगणू नेवाशाहून आकोटास गेले होते. अधिकृत रजा अर्थातच नव्हती. नेहमींसारखे फिरतीवर असल्याने परभारेच गेले होते.

इकडे त्यांच्या अधिकारक्षेत्रांतील नेवाशा-जवळच्या सातेगांव भालगांव येथें मोठा दरोडा पडून त्यांत गांवातील मारवाडी ठार झाला. सोने, चांदी, रोख रुपये मिळून सात आठ हजारांचा माल चोरीस गेला. पोलिसांची धांवपळ सुरू झाली. जमादार मात्र ठाण्यावर नाही हे पाहून इन्स्पेक्टर वॉर्डनसाहेब रागाने लाल झाला होता. 'जमादार कोठे गेला ? का गेला ? कोणाच्या परवानगीने गेला ?' याची चौकशी त्याने सुरू केली. दासगणूंच्या हाताखाली एक मुसलमान शिपाई 'अडली' म्हणून होता. त्याने चहाडी केली की 'जमादार बेलापूर स्टेशनवरून गाडीत बसून कोठे तरी गेले. त्यांनी आपले घोडे निपाणी वडगांवच्या कुलकर्ण्याकडे ठेवले आहे.'

कुलकर्ण्याच्या येथे शोध करण्यास पोलीस आले असतांना, त्या चतुर गृहस्थाने दासगणूंची पोलिस डायरी व इतर सरकारी कागद पत्रांचे दप्तर बळदांतील अडगळीत टाकून दिले व चौकशीस आलेल्या अधिकाऱ्यास सांगितले की, ''गणेश दत्तात्रय येथे आला होता. हे घोडे त्याचेच आहे. पण माझे पैसे त्याच्याकडून येणे असल्याने मी हे घोडे ठेवून घेतले. त्याचे बाकीचे सामान त्याने कोठे ठेवले ते मला माहीत नाही.''

चौकशीला आलेले पोलीस यानंतर परत गेले.

अकोटाहून माघारी आल्यावर कुलकर्ण्याचे दासगणूंस दरोड्याची सर्व हकीकत सांगितली. तो म्हणाला, ''गणपतराव, आता कसे होईल ? वॉर्डनसाहेब संतापला आहे. तुमच्याविषयी त्याला भलताच संशय आलेला दिसतो.''

''परमेश्वर करील ते खरे'' असे उत्तर देऊन दासगणू घोडे घेऊन बाहेर पडले. आता काही तरी बनाव केला पाहिजे, या विचाराने ते कापूस वडगांवास जाण्यास निघाले. रस्त्याने जातांना श्रीसाईबाबांनी दिलेली ताकीद त्यांना आठवली. बाबांची अवज्ञा केल्यानेच हे संकट आपणांवर कोसळले आहे, असे वाटू लागले.

वाटेत गोदावरी लागली. तेथे दासगणू येऊन पोचले. रात्रीचा एकदीड वाजला असेल. नदीत उभे राहून दासगणूंनी ओंजळीत पाणी घेतले व शिरडीकडे तोंड करून ते म्हणाले, 'बाबा ! यांतून सुखरूप पार पडलो तर मी नोकरी सोडीन. याला गंगामाईचीच साक्ष.' असे म्हणून त्यांनी पाणी सोडले आणि पुढे निघून गेले. रात्री अंधारात रस्ता नीट दिसत नव्हता. घोडे रस्ता चुकले आणि कापूस वडगांवास न येता ते भामाठाण बादाठाणास आले.

हे गांव मोगलाईतील असून येथील भिल्लांनीच दरोडा घातला होता. पहाटेच्या सुमारास घोडे गांवाजवळ आले. दरोडेखोर शेकोटी करून गप्पा मारीत होते. मालाच्या वांटणी संबंधी त्यांचा वाद चालला होता.

'मी मारवाड्यावर घाव घातले म्हणून माझा वाटा मोठा !' 'मी पेट्या पळविल्या म्हणून माझा वाटा मोठा !' असे ते भांडत होते.

जवळ आलेल्या दासगणूंनी जरा लक्ष देऊन ते ऐकताच सर्व परिस्थिति त्यांच्या लक्षात आली. 'या चावडीत उतरूं का ?' असे त्या भिल्लानांच विचारून ते सहज आल्यासारखे शेकोटीजवळ आले. धीर मोठा यांत शंकाच नाही. दासगणूंनी आपण वाटसरू असल्याचे भिल्लांना सांगितले. 'माझे शिंगरू हरवले ! आतां काय करावे ? कसे सांपडेल कुणास ठाऊक !' असे त्यांनी म्हटले तेव्हा त्यापैकी एकाने सांगितले, ''इथल्या अमिनाला कळवा.'' दासगणू म्हणाले, ''मी नवखा-मला अमिनाकडे घेऊन चलतोस का ? तुला कांही देईन.''

त्या भिल्लाबरोबर जाऊन दासगणूंनी अमिनाची गांठ घेतली. सर्व परिस्थिती त्याला सांगितली. गुन्हा पकडण्याचे सर्व श्रेय आपणांसच मिळेल असे त्याला निश्चयाने सांगितले. त्याप्रमाणे अमीन मदतीस आला व थोड्याच वेळात बहुतेक सर्व आरोपी मुद्देमालासकट पकडले गेले. इकडे बॉर्डनच्या देखरेखीखाली गुन्ह्याच्या तपासाची धामधूम चालू होती. दासगणूंनी अमीनास विनंती केली की 'आमचा साहेब येथून जवळच आहे. तरी कृपा करून हे आरोपी व हा मुद्देमाल त्यांस दाखवा. मग सर्वांसह आपण ठाण्यावर जाऊ. पुढे कायदेशीर रीतीने व्यवस्था होईल.' अमिनाने ते मान्य केले. बॉर्डन साहेबांपुढे येताच तो प्रथम दासगणूंवर खूप संतापला. पण आरोपी व मुद्देमाल पुढे केल्याने त्याचा राग जाऊन तो प्रसन्न झाला. दासगणूंच्या नोंदवहीवर त्याने फार चांगला शेरा दिला. 'आधी रिकामी होईल ती पहिली वरिष्ठ जागा इतरांच्या आधी यास द्यावी,' असे त्याने लिहिले. याप्रमाणे दासगणू संकटमुक्त झाले.

बढतीची अशा उत्पन्न झाल्यावर नोकरी सोडणे जिवावर येणे स्वाभाविकच होते. शिरडीस आल्यावर बाबांनी त्यांना हटकलेच. 'गणू, गंगेत शपथ कुणी वाहिली नोकरी सोडीन म्हणून ? अजून तरी डोळे उघड' पण दासगणूंनी तिकडे दुर्लक्ष केले !

पुढे एका प्रसंगात दासगणू खरोखरी कायद्याच्या कचाट्यात सापडण्याची वेळ आली. गुन्ह्याच्या तपासासाठी आरोपीस वागवितांना, मुळांत अनैतिक नव्हे, पण कायद्याच्या कक्षेबाहेरचे वर्तन झाले. हितशत्रूंनी या संधीचा फायदा घेऊन काहूर उठविले. शिक्षा होऊन नांवाला बट्टा लागतो की काय, अशी भीति उत्पन्न झाली. श्रीदासगणू त्वरेने शिरडीस गेले व बाबांना म्हणाले,

''मागच्या प्रकरणी माझ्याकडे चूक असूनहि मला वांचविलेत आणि आता मी निरपराधी असूनसुद्धा शिक्षा देवविणार काय ? तुमच्या पायाशपथ सांगतो-डाग न लागता सुटलो तर लगेच नोकरी सोडीन.''

बाबांच्या कृपेने खरोखर तसे घडले. चौकशीत दासगणू पूर्ण निर्दोष ठरले.

यानंतर मात्र दासगणूंनी नोकरी सोडण्याचा निश्चय करून राजिनामा पाठविला. राजिनामा दोन तीन महिने संमतच होईना. वरिष्ठ साहेबांनी समक्ष बोलावून ''वेड्यासारखे करूं नको, अजून राजिनामा परत घे. फकिराच्या नादी काय लागलास ? आपल्या पुढच्या आयुष्याचा काही विचार करशील की नाही ?'' इत्यादि सांगून समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. स्नेही, सोबत्यांनीही तीव्र विरोध दर्शविला. पण कशाचाहि उपयोग झाला नाही. करारी माणसाचा विचार ठरेपर्यंत अवकाश असतो. एकदां निश्चय झाल्यावर मग त्याला मागे वळविणे हे धबधब्यावरून कोसळणाऱ्या प्रवाहाला मागे फीर म्हणून सांगण्यासारखेच आहे.

नोकरी सोडून दासगणू शिरडीस आले. नोकरी सोडली. आता आपले पुढे काय ? ही विवंचना मागे होतीच. त्यांना काळजी लागलेली पाहून श्रीसाईबाबा म्हणाले, 'गणू, देव पाठीराखा असतांना चिंता कसली करतोस ? नांदेडकडे जा. तेथे मी तुझी सर्व व्यवस्था केली आहे !'

'बाबा, हे नांदेड कोणते ? पुण्याकडचे का ?'

'छे ! ते नाही. व समत नांदेड तिकडे जालन्याच्या खाली आहे. तिकडे जा.' श्रीसाईबाबांची आज्ञा शिरसावंद्य मानून दासगणू महाराज प्रथमच मोंगलाईत आले. त्यांचा 'संतकवी' असा जो लौकिक झाला तो याच प्रांतात.

(श्री. अ.दा. आठवले यांच्या 'संतकवि श्रीदासगणू महाराज' या चरित्रग्रंथावरून)

संग्राहक : **श्री. सुभाष जगताप**

महाशिवरात्र विशेष

# सौराष्ट्रीचा सोमनाथ



❖❖❖

**शिर्डी येथे श्री साईबाबा संस्थानाच्या वतीने जे उत्सव साजरे होतात त्यामध्ये महाशिवरात्र हा एक प्रमुख उत्सव आहे. त्यानिमित्त रात्री खास पालखी काढली जाते बाबांच्या गुरुंचे स्थान म्हणून पूजनिय झालेल्या लिंब वृक्षाखालील गुरुस्थानी महादेवाची पिंड व नंदीच्या मुर्ती आहेत हे लक्षात घेता बाबांच्या शिवाशी असलेला अंतरंग संबंध व्यक्त होतो. महाशिवरात्रीच्या निमित्ताने एक शिवचिंतन-**

❖❖❖

भगवंत ज्योतिर्मय आहे.आपणही एक दिवस ज्योतिर्मय बनले पाहिजे. त्याला ज्योतिरुप म्हणतात.ज्योतिरुप व्हायचे असेल तर ज्योतिर्लिंगांना नमस्कार करायला पाहिजे.

भारतात भाव निर्माण करणारी खुप तीर्थक्षेत्रे आहेत. त्यात बारा ज्योतिर्लिंगांचे अधिक महत्व आहे. जलचराप्रिय शिव शंकराला जलधार आवडते.आपणालाही त्याचे धारावाही वर्णन आवडेल. ज्योतिर्लिंग बारा आहेत. भारताच्या पृष्ठभागावर ती बारा ठीकाणी वसलेली आहेत.त्यांचा एक एक आगळाच इतिहास आहे.एक एक तीर्थक्षेत्र जसे भाववर्धक आहे. तसेच ते काही ना काही शिकवण देणारेही आहे. पहिले सोमनाथ. 'सौराष्ट्रे सोमनाथ च...' म्हणून आपण सौराष्ट्रातील सोमनाथाला नमस्कार करु या.

सौराष्ट्रात सोमनाथाजवळ गेले की, भाव उचंबळून येतात. सोमनाथानजीकचा सागर पाहिला की वाटते. शान्तचित्ताने इथेच बसून राहावे. सोमनाथाचे असे काही वेगळे आकर्षण आहे!

सोम म्हणजे चंद्र. त्या चंद्राने ज्याठिकाणी ''नाथ'' म्हणून हाक मारली आणि भगवान शंकर आले, त्या शंकराच्या रूपाचे नाव सोमनाथ. ज्या ठिकाणी कर्तृत्ववान माणसाची, प्रभुकार्य करणाराची गेलेली प्रभा परत मिळाली ते प्रभास.

या प्रभासमध्ये सोमनाथजवळ बसून अगस्त्यादी ऋषींनी व महापुरुषांनी मोठ्या श्रद्धेने साधना केलेली आहे. हजार वर्षापूर्वी महान् लोकोत्तर श्रीकृष्णानी तर नक्की केले होते. मला देहत्याग करायचा असेल तर तो या प्रभासलाच ! त्यांच्या मृत्यूला देहोत्सर्ग म्हणतात. **कृष्णस्तु भगवान् स्वयं ।**

भाव उभा राहील अशी ही जागा आहे. याठिकाणी एकहजार ब्राह्मण पूजा करण्यासाठी होते. तीनशे न्हावी हजामत करायला पुरत नसत, एवढे लोक तीर्थावर येत; अशी नोंद आहे. यावरून त्याचे वैभव केवढे होते, ते केवढे महान व पवित्र स्थान होते याची कल्पना करा. सोमनाथाची जागा अतिशय पवित्र आहे. त्याच्या आजूबाजूला विद्यालये व विश्वविल्यालये चालत होती. ज्या ठिकाणी संस्कृती उभी ठेवण्याची हिम्मत, शक्ती व ऐक्यभाव असतो त्याठिकाणी शेकडो यज्ञपुरुष उभे राहतात. शक्ती मिळवितात सोमनाथ हे कार्य सतत करीत आला आहे.

सोमनाथाजवळ दर्याकिनाऱ्याला अतिशय सुंदर जागा आहे. महंमद गझनी सोमनाथाचे मंदिर फोडू शकला. त्याचे कारण शोधून काढले पाहिजे. त्याच्यावर पुनःपुन्हा विचार करून माणसाने आज जागृत झाले पाहिजे. शहाणे झाले पाहिजे. केवळ राजभोग चढवून सोमनाथ प्रसन्न होत नाही. माणसाचा भोग चढला पाहिजे. किती माणसे जमतात ? किती एक विचाराची आहेत ? कितीजणांचा श्वास एकरूप आहे ? याला महत्त्व आहे. अशी ऐक्यशक्ती जिथे आहे तिथे भगवान आहे. महंमद गझनीने मंदिर तोडले ते आज आपण परत बनवले आहे. ते भावनेने उभे केले आहे. ज्यांनी ते उभे केले त्यांनी ते अतिशय पवित्रभावनेने उभे केले आहे. विशेषतः भारताचे प्रमुख त्या उद्घाटनाला होते ही कौतुकाची गोष्ट आहे. पण त्याच्या मागील गोष्ट ध्यानात आली तर जीर्णोद्धार फक्त दगडांचाच झाला आहे, विचारांचा नाही असे मानले जाईल आणि सुतार-गवंडी यांना पैसा मिळाला यापेक्षा दुसरे काही झाले नाही असे होईल. म्हणून या जीर्णोद्धाराच्या मागे जिवंतपणा उभा राहिला पाहिजे. ऐक्यभाव उभा राहिला पाहिजे. त्याच्याशिवाय संस्कृती उभी राहाणार नाही. **बुद्धं शरणम् गच्छामि । संघं शरणम् गच्छती । धम्म शरणम् गच्छामि ।** हा ऐक्यभाव कोणाजवळून घ्याल ? सोमनाथजवळून घ्या. हा ऐक्यभाव नसेल तर संसार नाही, संस्कृती नाही. सोमनाथ आपणास भाव देतो, ऐक्य देतो.

*('जीवनतीर्थ'वरून साभार)*

पुण्यस्मरण

# अवतारी संत :
# शेगांवचे गजानन महाराज


❖❖❖

**श्री शेगांव हे विदर्भातील पंढरपूर म्हणून विख्यात झालेले आहे. संत श्रेष्ठ गजानन महाराजांची पावन भूमी. श्री गजानन महाराजांनी समाधी घेतली तेव्हा 'माझा मोठा भाऊ गेला' असे शोक उद्गार श्रीसाईबाबांनी काढले होते.**

❖❖❖

**धन्य धन्य ती माघ सप्तमी ।**
**दिनमणी उगवला गजानन । पुण्य परुष प्रगटला ॥**

'शेगांव' विदर्भातलं प्रसिद्ध तीर्थक्षेत्र. बुलढाणा जिल्ह्यातल्या खामगांव तालुक्यात आहे. धनधान्यानं समृद्ध असलेलं शेगांव हे गांव. या गावांत देविदास पातुरकर नावांचे एक गृहस्थ होते. माघ वद्य सप्तमीला त्यांच्या घरीं एक घरगुती समारंभ होता. भोजनाच्या पंक्ती उठल्यावर उष्ट्या पत्रावळी घराजवळच उकिरड्यावर टाकण्यांत आल्या. वटवृक्षाच्या सवलीत असलेल्या पत्रावळीच्या मध्यभागी एक तरुण येऊन बसला. तो दिगंबर होता. त्याच्या अंगावर एकही वस्त्र नव्हतं. त्या पत्रावळींतलं एक एक उष्ट शित म्हणजे अन्नाचा कण तो तरुण खाऊ लागला. अन्न असं वाया घालवू नये, फेकू नये हेच त्या पुरुषाला कदाचित सुचवायचं असावं. हे सगळं प्रत्यक्ष पहिलं शेगांवचेच बंकटलाल आगरवाल आणि त्यांचे मित्र दामोदरपंत कुळकर्णी यांनी. ते परस्परांत बोलायला लागले की हा पुरुष काही वेडा नसावा. कारण वेडा असला तरी त्याला अन्नाची चव कळते. परंतु याचं पिळदार शरीर तेजःपुजं चेहरा पाहून तरी वेगळाच कुणी वाटतो. म्हणून ते दोघेही देविदाससंतांच्या घरी गेले. त्यांच्या विनंतीवरून देविदासांनी एका पानावर पक्कान्न वाढून आणली. परंतु त्या तरुणानं ती पक्कान्न आणि वेचलेली उष्टी शितं एकत्र कालवून खायला सुरुवात केली. या विदेही सुरुवात केली. या विदेही इसमाला जेवणानंतर तहान लागेल म्हणून देविदास एका मांड्यात वाळा घातलेलं गार पाणी घेऊन आले. पण त्या आधीच तो तरुण समोरच असलेल्या मातीच्या टाक्याजवळ गेला. त्यातलं पाणी जनावरं पीत होती. जमलेली मंडळी आश्चर्याने म्हणायला लागली, ''अहो ! जनावरांनी गढूळ केलेलं पाणी तुम्ही कशाला पिताय्''. त्यावेळी तो तरुण योगी उद्गारला, ''पाणी देवानंच निर्माण केलंय ना !'' पाणी, या टाक्याची माती आणि मी पाणी पिणारा ही तीनही रुपं मला एकच वाटतात. हे ऐकताच शेगांवचे भाविक समजले की हा कुणीतरी योगी, संतपुत्पुरुष आहे. बघता बघता तो योगी वाऱ्यासारखा पळता पळता अदृश्य झाला. दिसेनासा झाला. तोच योगी पुढे सर्वमान्य संत ठरला. ''शेगांवचे संत गजानन महाराज'' हेच त्याचं नाव.



**बुडविता तुंबा पाण्यांतरी !**
**देखिली गंगा ओढ्यांतरी !**

शेगावात मोटे सावकारांनी बांधलेलं एक भव्य शिवमंदिर आहे. तिथे बंकटलाल आगरवाल आणि पितांबर शिंपी शंकराच्या दर्शनासाठी गेले. तिथे मागल्या बाजुला फरसावरती श्रीगजानन महाराज त्या उभयतांना दिसले. तोच बंकटलाल आणि पितांबर जवळ गेले. श्रींनी वंदन केलं. ''महाराज ! आपल्यासाठी खायला काही आणू का ?'' त्यावर महाराज उद्गारले, ''तुला गरज असेल तर आण झुणकाभाकर, त्या समोरच्या माळिणीच्या घरुन !'' बंकटलाल माळिणीकडे गेले, तो खरोखरच तिनी नुकतीच ताजी झुणकाभाकरी तयार केलेली. बंकटलालांनी आणून समर्थ गजानन महाराजांसमोर ठेवली. त्याचवेळी समर्थ पितांबराला म्हणाले ''हा तुंबा घेऊन जा समोरच्या ओढ्यातून पाणी घेऊन ये. मात्र ओंजळीनी पाणी भरू नकोस. तुंबा ओढ्यांत बुडवून पाणी --- तुंबा घेऊन पितांबरी ओढ्याजवळ गेले. पावलाचे तळवे बुडतील एवढं देखील पाणी त्या ओढ्यात नव्हतं. परंतु श्री गजानन महाराजांचं नामस्मरण करुन पितांबरानं तो तुंबा ओढ्यातल्या वाळुला लावला. तो काय आश्चर्य ! त्या वाळूंत खळगा की निर्माण झाला ! स्फटिकासारखं, गंगेसारखं निर्मळ पाणी तुंबा बुडवून पितांबरी श्रीगजानन माहाराजांसाठी घेऊन आला समर्थ गजानन महाराजांच्या वाणीत सत्यात आहे. -हे

साक्षात्व- संत आहेत, सहे शेगांवकरांना कळलं. रात्री मंदिरात गोविंद-- टाकळीकर यांचा कीर्तन सुरु होतं. 'निरुपण' बुवांनी केलं. -- कीर्तनाचा उरलेला भाग श्री गजानन महाराजांनी सांगितला अशा ह्या ज्ञानी योगेश्वराला एकदा बंकटलाल सोम-- संध्याकाळी स्वतःच्या घरी घेऊन गेले. पाटावर बसवून श्री- थाटांत श्रीगजानन महाराजांचं पूजन केलं. मंगलस्थान सम-- घातलं. भरजरी पितांबर नेसवला. केशर-अत्तर मि-- चंदनाचा टिळा महाराजांच्या कपाळी लावला. सुगंधित फुलमाळ गळ्यात घातली. समोर चांदीच्या ताटांत खाद्यपदार्थ आणि काजू-बदाम-खारका इत्यादि सुकामेवा ठेवला श्रीगजानन महाराजांनी तो सगळा नैवेद्य सेवन केला. एवढ्यात बंकटलालांचे चुलत भाऊ इच्छाराम शेठजी दर्शनाला -- तेही समर्थांना विनंती करून आपल्या वाड्यात घेऊन गेले मनोभावे योगेश्वराचं पूजन केलं. एका मोठ्या पात्रात जिलेबी-लाडु-करंज्या अनारसे, धीवर, चटण्या कोशिंबिर, दह्याची वाटी, तुपाची वाटी असं चार माणसांना पुरेल एवढं -- समर्थांच्या समोर ठेवलं. श्रीगजानन महाराजांनी ते सगळं अन्न खाऊन संपवलं. मनुष्याला आवश्यक असलेल्या आहारापेक्षा, आग्रहानं, जास्तीचं, आधाशीपणानं खाल्लं तर अन्न पचत नसतं, हे दाखवायला श्री गजानन महाराजांनी सगळं अन्न तोंडावाटे बाहेर पाडलं, ''गण गण गणांत बोते'' हे भजन करीत श्रीगजानन महाराज जागेवरच तल्लीन झाले. किती तरी भक्तांनी त्यांच दर्शन घेतलं असेल पण सद्‌गुरुमूर्ती मात्र निजानंदात, मग्न होती. जणू प्रत्यक्ष गौरीशंकर भगवान महादेवच, सोमवारी इच्छारामाच्या वाड्यात आलेत, असं भाविकांना वाटत होतं.

**घेई समाधी महामुनी**

पुढे हरी पाटलांना घेऊन श्रीगजानन महाराज पंढरपूरला पांडुरंगाच्या दर्शनार्थ गेले. ''आता अवतार संपवितो'' अशी आज्ञा पांडुरंगला मागितली. नंतर शेगांवला परत आले. महाराज भक्तगणांना म्हणाले, ''भाद्रपद शुद्ध चतुर्थीला पार्थिव गणपती करावा. त्याची पूजा अर्चा करावी. नैवेद्य समर्पण करावा; आणि पंचमीला गणपती-विसर्जन करावं. अशी कथा गणेशपुराणांत आहे !'' तसंच मलाही आता निरोप द्यावा.'' भक्त आश्चर्याने बघत असताना श्रीमद्‌भगवत्‌ गीतेत भगवंतांनी अर्जुनाला सांगितल्या प्रमाणे जेजे ब्रह्मवेत्ते झाले ! त्यांनी त्यांनी केवळ शरीरवस्त्रासी बदलले ! असं म्हणून बाळाभाऊंचा हात धरला आणि म्हणाले, ''मी गेलो असं समजू नका. परमेश्वराची अविरत भक्ती करा. माझाहि विसर पडु देऊ नका !'' असं म्हणून श्री गजानन महाराजांनी आपला श्वास रोखून धरला. स्वतःची प्राणज्योत ब्रह्मांडात नेऊन ठेवली. शके अठराशे बत्तीस म्हणजे इ.स. १९१० साधारण नामक संवत्सरांत भाद्रपद शुद्ध पंचमीला (ऋषिपंचमी) गुरुवारी पहिल्या प्रहरांत हा महामुनी ब्रह्मलीन झाला ! आपण समाधी घेतल्याची वार्ता अनेक भक्तांना प्रत्यक्ष श्रीगजानन महाराजांनी त्या भक्तांच्या स्वप्नात जाऊन सांगितली. असंख्य भक्तांचे मेळे, ऋषिपंचमीला शेगांवात आले. शेगांव नगरीला प्रत्यक्ष पंढरीच स्वरूप प्राप्त झालं. रथ तयार करण्यात आला. रस्तोरस्ती सडे घालून स्त्रीयांनी रांगोळ्या काढल्या. सजवलेल्या रथात श्रीगजानन महाराजांचा पार्थिव देह ठेवण्यात आला आणि मिरवणूक निघाली. भाविक तुळशी-बुक्का-फुलं उधळू लागले. समोर दिंड्या विठ्ठलाच्या नांवाचा गजर करीत चाललेल्या. रस्त्याच्या दुतर्फा उभ्या असलेल्या लोकांना गुलाल-बुक्का-फुलं उधळू लागले. समोर दिंड्या विठ्ठलाच्या नावाचा गजर करीत चाललेल्या. रस्त्याच्या दुतर्फा उभ्या असलेल्या लोकांना गुलाल-बुक्का-हळद-कुंकु लावून काही भाविक स्त्री-पुरुष प्रसाद वाटत जात होते. दुसरे दिवशी सूर्योदयाला रथयात्रा मठात परत आली. सद्‌भक्त भास्कर पाटील यांनी आधीच तयार करुन ठेवलेल्या समाधीच्या जागेवर समर्थांची पार्थिव मूर्ती नेऊन ठेवण्यात आली. समर्थांच्या देहाला रुद्राभिषेक करण्यांत आला. पूजन करून पंचारती उजळण्यांत आली. शेगांव नगरी नाम गजर करीत असतानाच, उत्तरेकडे तोंड फिरवून बसवलेल्या मूर्तीचं अखेरचं दर्शन सगळ्यांनी घेतलं. समर्थ गजानन महाराजांचा जयजयकार सुरुं असतांनाच मीठ-अर्गजा-अबीर भरुन, शेवटचा पाषाण लावून समाधीस्थळाचं द्वार भक्तगणांनी बंद केलं. दहा दिवस पर्यंत समाराधना झाली नंतर प्रसाद घेऊन, सगळी भाविक मंडळी आपापल्या घरी गावाला परत गेली.

त्यानंतर अनेक धनिक भाविकांनी, गरीबांपासन श्रीमंतापर्यंत असंख्य भक्तांनी आपापल्या ऐपतीनुसार देणग्या दिल्या, वर्गणी गोळा केली आणि भव्य दिव्य मंदिर बांधण्यात आलं. श्रीराम मंदिर भक्तनिवास, फुलमाळ्यांची दुकानं, नारळ मिठाई, प्रसादाची दुकानं, - गरुडखांब, समर्थांची गादी व्यवस्थापन कार्यालय - पारायणाचं स्थान प्रसादासाठी सभागृह हे सगळं शेगांव मंदिर परीसरात आजही बघायला मिळतं. रेल्वे स्टेशन ते मंदिर भक्तांना ये-जा करण्यासाठी विनामूल्य प्रवासी बससेवा देवस्थानतर्फे सुरु करण्यात आली. धर्मार्थ दवाखाना काढण्यात आला. शेगांव-खामगांव मार्गावर ''श्रीगजानन वाटिका'' हे रमणीय उद्यान तयार करण्यांत आलं. तिथेही समर्थांचं दर्शन घडावं म्हणून श्रीगजानन महाराजांची मूर्ती एका हौदात मध्यभागी बसवण्यांत आली. शेगांव म्हणजे विदर्भाचं पंढरपूर झालंय !

**॥ संत हेच भूमीवर ! चालते बोलते परमेश्वर ॥**



लोकमान्य टिळकांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या शिवजयंती उत्सवात गजानन महाराजांची उपस्थिती

# अभिप्राय




## हरुण अल रशिद खलिपा नव्हते

दसरा विशेषांक वाचला. खूपच आवडला. श्री. कुळकर्णी यांच्या लेखात 'मुसलमान धर्मानुसार पैंगबर, अबुबकर, उमर व हरुन अल रशिद असे ४ खलीप होऊन गेले'' असे वाक्य आहे, ते चूक आहे. हरुण अलरशिद खलिपा नव्हते, बादशहा होते. हजरत अबूबकर उमर, उस्मान आणि अली हे ४ खलिपा होते.

दुरुस्त सूचनेबद्दल धन्यवाद. : कार्यकारी संपादक

**सुरेश भावसार,**
पानखड्की, अमेळनर

## वाचनीय अंक

श्री साईलीलाचे अलिकडील अंक अगदी वाचनीय असतात. मी कीर्तनाकार व संत साहित्याचा लेखक आहे. आपले वाचून मला लिखाणाची स्फुर्ती होते. तरी ते लेखन आपणाकडे पाठवू का ?

जरुर पाठवा : कार्यकारी संपादक

**ह. भ. प. भाऊसाहेब गंभीर**
एम. ए. कीर्तनकोविद, नाशिक

## दसरा विशेषांक आवडला

श्री साईलीला दसरा विशेषांक वेळेव मिळाला. मासिकातील सर्वच लेख वाचनीय आहेत. एकूण दसरा विशेषांक खूप आवडला.

**डॉ. संभाजीराव निंबाळकर**
निसर्गोचार तज्ज्ञ, नाशिक रोड.

## साईलीला म्हणजे साईप्रसादच

सप्टेंबर-ऑक्टोबर ९७ चा अंक मिळाला. अंक संपूर्ण वाचला. छान आहे. मुखपृष्ठ आवडले. श्री. साईलीला अंक घरी आला की श्रीसाईप्रसाद मिळाल्याचा आनंद होतो. श्री साईलीला अंक वेळेवर मिळतो त्याबद्दल आम्ही श्रीसाईभक्त आपले आभारी आहोत.

आपण गेली तीन वर्ष काही कामे केली ती फारच छान केली. त्याबद्दल आपले आणि विश्वस्त मंडळाचे आम्ही श्री साईभक्त अभिनंदन करतो आणि हार्दिक शुभेच्छा देतो.

**अविनाश द. पाध्ये**
मुंबई.

## समाधीस ७९ वर्षे झाली

आपण पाठविलेल्या यंदाचा 'दसरा विशेषांक' मिळाला. यातच 'दसरा विशेषांक' मिळाला. यातच 'दसरा' सणाचा मोठा आनंद गवसला. श्री साईबाबा इ. स. १९१८ साली या जगाचा आनंदाने निरोप घेऊन गेले. त्यांचे हे ''सीमोल्लंघन'' होते. या घटनेस ७९ वर्षे (६९ असे नजरचुकीने छापले आहे) झाली आहेत. देह सोडल्यावरही सत्याचे जनकार्य चालूच राहिले असते याचे प्रत्यक्ष बाबांनी साऱ्या जगाला दाखवून दिले. मृत्यू हा देहाला असतो, 'सत्कार्य' अमर रहात असते हेसुद्धा बाबांनी प्रत्यक्षपणे जगाच्या नजरेस आणून दिले आहे.

आपण अतिशय परिश्रमपूर्वक हा विशेषांक प्रसिद्ध केला आहे, हे संशयातीत आहे. सजावट उत्तमच आहे. अंकातील सर्वच मजकूर वाचनीय व संग्रही ठेवण्यासारखा आहे. आपल्या हातून उत्तरोत्तर अशीच उत्तम साईसेवा घडत राहो, ही त्या दयाघन श्री साईबाबांच्या चरणी विनम्र प्रार्थना. धन्यवाद.

दुरुस्ती सूचनेबद्दल धन्यवाद : मुद्रितदोष राहिल्याबद्दल दिलगीर आहोत. कार्यकारी संपादक)

**शाम जुवळे**
मुंबई

# साईभक्तांना आवाहन

प्रिय साईभक्तांनो !
सप्रेम नमस्कार,

आपण 'श्री साईलीला'चे वाचक आणि वर्गणीदार आहात. 'श्री साईलीला'चे नवे स्वरूप आपण सर्वांनाच आवडले आहे. आपणापैकी तशी पत्रे आम्हाला पाठविली आहेत. त्याबद्दल धन्यवाद !

श्री साईबाबांचे कार्य, त्यांची शिकवण, भक्तांना आलेले त्यांचे अनुभव आणि अध्यात्माचा प्रसार अधिकाधिक लोकांत करणे म्हणजेच साईसेवा आहे. त्यासाठी 'श्री साईलीला' सर्वाधिक लोकांपर्यंत पोहोचावयास हवा. या साईसेवेत आपण वाढ करू शकता !

आपण फक्त पाच वर्गणीदार 'श्री साईलीला'स मिळवून द्यायचे. यामुळे आपल्या हातूनही साईसेवा घडेल आणि श्री साईबाबा आपल्यावर कृपा करतील याची आपणासही कल्पना आहेच.

तरी खालील फॉर्मवर पाच वर्गणीदारांचे पत्ते व प्रत्येकी ५० रु. प्रमाणे एकूण २५० रु. पाठवावे.

कळावे. श्री साईबाबांच्या आशीर्वादासह !

आपला स्नेहांकीत,
**विद्याधर ताठे**
कार्यकारी संपादक
'श्री साईलीला'

------------------ इथे कापा ------------------

कार्यकारी संपादक
'श्री साईलीला',
८०४-बी, साईनिकेतन,
डॉ. आंबेडकर रोड, दादर (पू.),
मुंबई - ४०० ०१४.

यांस,

आपण साईभक्तांना आवाहन केल्याप्रमाणे सोबतच्या जोडलेल्या कागदावर पाच वर्गणीदारांचे पत्ते पाठवीत असून त्यांची प्रत्येक ५० रु. प्रमाणे रु. २५० (एकूण दोनशेपन्नास मात्र) सोबत मनीऑर्डरने/चेकद्वारा/रोख पाठवीत आहे. त्याचा स्वीकार व्हावा.

श्री साईबाबांच्या शिकवणुकीचा प्रसार करण्याची संधी आपण यानिमित्ते मला देऊन साईसेवा करण्यास उद्युक्त केलेत याबद्दल आभारी आहे. कळावे.

आपला,

नाव : ______________________

पत्ता : ______________________

______________________

(ता.क.: सोबतच्या कागदावर पाच नव्या वर्गणीदारांचे पत्ते जोडले आहेत.)

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्रमांक | पुस्तकाचे नाव | भाषा | किंमत | पॅकिंग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्चरित | मराठी | ४८.०० | १२.०० |
| २. | श्री साई सत्चरित | इंग्रजी | १८.५० | १०.०० |
| ३. | श्री साई सत्चरित | हिंदी | २४.०० | १०.०० |
| ४. | श्री साई सत्चरित | गुजराथी | २३.०० | १०.०० |
| ५. | श्री साई सत्चरित | कन्नड | २२.०० | १०.०० |
| ६. | श्री साई सत्चरित | तेलुगु | २७.०० | १०.०० |
| ७. | श्री साई सत्चरित | तामीळ | २७.०० | १०.०० |
| ८. | श्री साई सत्चरित | सिंधी | २२.०० | १०.०० |
| ९. | श्री साई सत्चरित पोथी | गुजराथी | ३१.०० | १२.०० |
| १०. | श्री साईलीलामृत | मराठी | ९.५० | १०.०० |
| ११. | श्री साईलीलामृत | हिंदी | १२.५० | १०.०० |
| १२. | श्री साईलीलामृत | गुजराथी | ६.६५ | ८.०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ६.८० | ८.०० |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | १.०० | ८.०० |
| १५. | स्तवन मंजिरी | हिंदी | १.१५ | ८.०० |
| १६. | स्तवन मंजिरी | गुजराथी | १.३० | ८.०० |
| १७. | स्तवन मंजिरी | इंग्रजी | २.०० | ८.०० |
| १८. | सगुणोपासना (आरती) | मराठी | १.२५ | ८.०० |
| १९. | सगुणोपासना (आरती) | हिंदी | १.५० | ८.०० |
| २०. | सगुणोपासना (आरती) | गुजराथी | १.१० | ८.०० |
| २१. | सगुणोपासना (आरती) | तेलुगु | ४.६० | ८.०० |
| २२. | सगुणोपासना (आरती) | सिंधी | - | ८.०० |
| २३. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | ३.०० | ८.०० |
| २४. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | - | ८.०० |
| २५. | मुलांचे साईबाबा | मराठी | २.०० | ८.०० |
| २६. | मुलांचे साईबाबा | इंग्रजी | २.६० | ८.०० |
| २७. | मुलांचे साईबाबा | हिंदी | २.०० | ८.०० |
| २८. | मुलांचे साईबाबा | गुजराथी | १.७५ | ८.०० |
| २९. | मुलांचे साईबाबा | तेलुगु | - | ८.०० |
| ३०. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | १.१५ | ८.०० |
| ३१. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ६.७० | ८.०० |
| ३२. | साईबाबा ऑफ शिरडी (भरुचा) | इंग्रजी | - | ८.०० |
| ३३. | साईबाबा ऑफ शिरडी (प्रधान) | इंग्रजी | ३.५० | ८.०० |
| ३४. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | - | १०.०० |
| ३५. | खापर्डे डायरी | इंग्रजी | ११.०० | १०.०० |



# श्री साईबाबा संस्थान शिरडी

## विश्वस्त मंडळ


श्री. द. म. सुकथनकर
(अध्यक्ष)

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. मोहन मो. जयकर | (सदस्य) | श्री. रायभान ग. चिने | (सदस्य) |
| श्री. रमेश दा. सोनी | " | श्री. भास्कर शं. बोरावके | " |
| श्रीमती रेखा ग. दिघे | " | श्री. अण्णासाहेब सा. म्हस्के पाटील | " |
| श्री. प्रकाश व. कारखानीस | " | श्री. राजीव पुं. रोहोम | " |
| श्री. मुकेश र. पटेल | " | श्री. संभाजी कि. काळे | " |
| श्री. मधुकर द. जोशी | " | श्री. अशोक भि. खांबेकर | " |
| श्री. प्रकाश प्र. वैशंपायन | " | सौ. प्रेमाबाई सो. बज | " |
| श्री. मधुकर ज. गर्दे पाटील | " | श्री. रामचंद्र नि. गोसावी | " |
| श्री. देवकीनंदन शं. सारस्वत | " | श्री. प्रभाकर तु. बोरावके | " |
| श्री. आप्पासाहेब खं. कोते | " | श्री. सोपान मा. धोर्डे | " |

# पुण्यतिथी उत्सव - क्षणचित्रे



दसरा उत्सवातील सीमोल्लंघन मिरवणूक :
खंडोबा मंदिरापुढे



उत्सवातील भिक्षा सोहळ्याचे एक क्षणचित्र




उत्सवात हजेरी देऊन अनेक कलाकार आपली साईसेवा करतात.
अशीच सेवा करताना टी. अंकुश व पार्टी, मुंबईचे कलाकार



उत्सवात कीर्तन सोहळ्यातील एक प्रसंग :
कीर्तनकार श्री. रवंदे व संस्थानचे अध्यक्ष श्री. सुकथनकर यांची रंगलेली फुगडी



साईआराधना-पूजा करताना
विश्वस्त श्री. प्रभाकर बोरावके व सौ. बोरावके

Registered with the Registrar for News-papers of India No. MH/527

# महाराष्ट्राचे मा. राज्यपाल श्री. पी. सी. अलेक्झांडर यांच्या
# शिरडी भेटीची क्षणचित्रे



श्री साईबाबा संस्थानचे अध्यक्ष श्री. व. म. सुकथनकर मा. राज्यपालांचे स्वागत करताना

श्री साईबाबांच्या समाधीचे सपत्नीक दर्शन घेताना मा. राज्यपाल





संस्थानचे अध्यक्ष मा. राज्यपाल यांना श्री साईबाबा मंदिर विस्तारीकरणाचा आराखडा समजावून दाखविताना

चावडी दर्शन : मा. राज्यपालांसमवेत नामदार राधाकृष्ण विखे पाटील, संस्थानचे अध्यक्ष व विश्वस्त





संस्थानतर्फे शाल व साईमूर्ती भेट देऊन मा. राज्यपालांचा सत्कार

श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत नियतकालिक

मार्च-एप्रिल, १९९८



# श्री साईलीला

## (रामनवमी विशेषांक)

संपादक : द. म. सुकथनकर

कार्यकारी संपादक : विद्याधर ताठे

**अमृत महोत्सवी वर्ष**



रामाय राम भद्राय रामचंद्राय वेधसे।
रघुनाथाय नाथाय सीतायाः पतये नमः॥

# क्षणचित्रे

## श्री साईबाबा मंदिर परिसर पुनर्विकास भूमिपूजन समारंभ



श्री साईबाबा समाधी मंदिर परिसर पुनर्विकास प्रकल्पाच्या भूमिपूजन समारंभाचा श्रीगणेशा श्रीसाईबाबांच्या पाद्यपूजेने करण्यात आला. पाद्यपूजा करताना संस्थानचे अध्यक्ष श्री. द. म. सुकथनकर, सौ. सुकथनकर आणि विश्वस्त मंडळाचे सदस्य.



भूमिपूजनापूर्वी अभिषेक पूजेचे क्षणचित्र.



विधीपूर्वक पूजेचे आणखी एक क्षणचित्र
मा. अध्यक्ष, विश्वस्त मंडळाचे सदस्य आणि
संस्थानचा सेवकवर्ग.



भूमिपूजनातील एक विधी.



भूमिपूजनानंतर अवजारांपुढे नारळ वाढविताना
संस्थानचे अध्यक्ष.

श्री साईबाबा संस्थान शिरडीचे
अधिकृत नियतकालिक

**श्री साईलीला**

वर्ष ७५

मार्च-एप्रिल १९९८

: संपादक :
द. म. सुकथनकर

: कार्यकारी संपादक :
विद्याधर ताठे

: कार्यालय :
'साईनिकेतन',
८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई - ४०० ०१४.
दूरध्वनी. : ४१६ ६५ ५६
फॅक्स : (०२२) ४१५ ०७९८

: मुद्रक :
गीता ऑफसेट, मुंबई.

: टाईपसेटींग :
देवयानी एन्टरप्रायझेस, मुंबई.

वार्षिक वर्गणी : रु. ५०/-
आजीव सभासद वर्गणी : रु. १०००/-
परदेशाकरिता वार्षिक वर्गणी :
रु. १०००/-
(टपाल खर्चासहित)
अंकाची किंमत : रु. ८/-

मुद्रक, प्रकाशक द. म. सुकथनकर, अध्यक्ष श्री साईबाबा संस्थान शिरडी यांनी हे नियकालिक, 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - १४ येथे छापून प्रसिद्ध केले.

या नियतकालिकातील लेखात प्रसिद्ध झालेली मते ही त्या लेखातील लेखकांची स्वतंत्र मते असून त्या मताशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

# अमृतमहोत्सवी वर्ष
(१९९७-९८)




# रामनवमी विशेष

## अंतरंग


- **संपादकीय** : विद्याधर ताठे — २
- **रामनवमी विशेष** : रामायणातील बोध — ३
- **साई उवाच** : संग्राहक - श्री. सोमण प्र. का. — ७
- **श्री साईबाबा समाधी मंदिर पुनर्विकास प्रकल्पाची कहाणी** — १०
- **असे भक्त, अशी भक्ती** : प्रा. सौ. देशपांडे — १८
- **श्रीमद् शंकराचार्य जयंती पुण्यस्मरण** — २१
- **भक्ती (भाग २)** : वसंत दळवी — २८
- **स्वामी समर्थ जयंती स्मरण** : प्रा. नरेंद्र कुंटे — ३३
- **जीवनाची छाया** : शाम जुवळे — ३७
- **'प्रसाद'चा सुवर्णमहोत्सव** : डॉ. अशोक कामत — ३९
- **अमृत कलश (जुने शब्दधन)** — ४२
- **सुभाषित रसास्वाद: ।** : सु. ह. जोशी — ४६
- **साईअनुभव** — ४७
- **साईवंदना (कविता, गीते, भजन)** — ४९
- **सानंद धन्यवाद** — ५०
- **आवाहन** — ५२

# संपादकीय

विद्याधर ताठे




**धन्य कुळ त्याचे । राम नाम हेचि वाचे ।**
**दोष हरतील जन्माचे । श्रीराम म्हणताची ।**

प्रभू रामचंद्राचा अवतार हा 'मर्यादा पुरुषोत्तम' म्हणून सर्वत्र आदर्श मानला जातो. प्रभू रामचंद्राच्या महात्म्याबद्दल महात्मा गांधी, राम मनोहर लोहिया, पंडित नेहरू आदी राष्ट्रपुरुषांनी सुद्धा लिहिलेले आहे. संत महंतांनी तर रामाचे पूजनच केलेले आहे. आसेतु हिमाचल भारताच्या एकात्मतेचे श्रीराम हे एक प्रतिक आहे. दुष्टांचे निर्दालन आणि सज्जनांचे पालन-रक्षण हे श्रीरामाच्या अवतार कार्याचे मर्म असून आजच्या स्थितीमध्येही श्रीरामाचे हे कार्य आपणास प्रेरणादायी आहे. देशाच्या विविध प्रांतांमध्ये विविध भाषेमध्ये वेगवेगळी रामायणे आपणास आढळतात. यावरून रामचरित्राचा जनमानसावरील विलक्षण प्रभाव लक्षात येतो. एवढेच नव्हे तर राम कथा ही देशाच्या सीमा पार करून गेली असून जावा-सुमात्रासह अनेक देशात रामकथेचा प्रभाव आजही तेथील संस्कृतीवर स्पष्टपणे जाणवतो.

श्री. साईबाबांनी शिर्डी येथील उरुस-यात्रा रामनवमी दिनी भरवण्याची भक्तांना जी अनुज्ञा दिली त्यामागे श्री साईबाबांचा नेमका विचार काय होता ? ही गोष्ट कोठेही लिहिलेली आढळत नाही. तरी पण श्री साईलीलावरुन आपणास काही अनुमान निश्चित करता येते. बाबांनी एका डॉक्टर रामभक्तास रामरुपात दर्शन देऊन 'सबका मालिक एक' या व्यापक तत्वाचेच दर्शन घडविले होते. बाबांची ही लीला लक्षात घेण्यासारखी आहे. बऱ्याच वेळा भक्ती मार्गातील परमार्थाच्या वाटेवरील साधक-भक्तासही आपल्या पंथाचा, आपल्या इष्ट देवतेचा, तिच्या रुपाचा अहंकार होतो व तो इतर देवतांना, इतर उपासना पद्धतींना तुच्छ लेखू लागतो. श्री साईबाबांनी विविध भक्तांना त्यांच्या-त्यांच्या इष्ट देवतेच्या रुपामध्ये दर्शन देऊन सर्वत्र एकच ईशतत्त्व भरुन उरल्याच्या महातत्त्वाचा बोध केलेला आहे.

**चाहे गीता बाचिये, या पढिये कुरान ।**
**तेरे मेरा प्यारही हर पुस्तकका ज्ञान ।**

प्रसिद्ध गीतकार, शायर निदा फाजली यांच्या वरील दोन ओळी श्रीसाईबाबांच्या मानवधर्माचे दर्शन घडविणाऱ्या असून **'मजहब नही सिखाता आपस में बैर करना ।'** ही गोष्ट आपण समजून घेतली पाहिजे - आचरणात आणली पाहिजे. यामध्ये आचरण महत्त्वाचे आहे कारण त्यामुळेच माणसामाणसात प्रेम व बन्धुभावाचे सौहार्द वातावरण निर्माण होऊ शकते. या संदर्भात साधू वासवानी यांचे पुढील वाक्य महासंदेशच आहे.

Religion !
talk less, practice more !

रामनवमीच्या या अंकापासून श्रीसाईलीलाच्या नव्या वर्षाच्या नव्या वाटचालीस प्रारंभ होत आहे. या अंकात **'साई उवाच'** हे नवे सदर सुरु करण्यात आलेले आहे. साईसचरित पोथीतील श्रीसाईबाबांच्या अवतरणांचे श्री सोमण यांनी संकलन केले असून ते संकलन अध्यायवार प्रकाशित करण्यात येणार आहे. रामनवमी उत्सवात शिर्डीत निशाणांच्या मिरवणुकांचे एक आगळे वेगळे महत्व आहे. हे लक्षात घेऊन ती निशाणे ज्या घराण्यांतर्फे गेली अनेक वर्षे परंपरेने लावली जातात त्यामध्ये निमोणकर घराणे एक होय ! त्या निमोणकर घराण्यातील स्व. गोपाळराव यांच्या साईभक्तीचा परिचय आम्ही 'असे भक्त अशी भक्ती' या स्तंभात करून दिलेला आहे. त्याशिवाय शंकराचार्य जयंती, अक्कलकोट स्वामी जयंती हे दिनविशेष लक्षात घेऊन त्याविषयी सुद्धा वाचनिय साहित्य आम्ही या अंकात दिलेले आहे. अध्यात्मिक विषयावरील विविध अंक काढून 'प्रसाद' मासिकाने मराठीत आपले एक स्थान निर्माण केलेले आहे. त्या 'प्रसाद' मासिकाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्तही आम्ही एक लेख प्रकाशित केलेला आहे. आमच्या त्या छोट्या भावंडास आमच्या पुढील वाटचालीस सहर्ष शुभेच्छा !

**विद्याधर ताठे**
कार्यकारी संपादक, श्री साईलीला

रामनवमी विशेष

# रामायणातील बोध

– साईचरणकण




## रोमारोमात 'राम'

नंदीग्राममध्ये भरताने लक्ष्मणाची पत्नी उर्मिलेचा परिचय हनुमानाशी करुन दिला. लागलीच हनुमानाने उर्मिलेला प्रणिपात केला. उर्मिलेच्या डोळ्यांत आसवं नव्हती. ब्रह्मचारी हनुमंताला शंका आली, उर्मिलेचं सौभाग्य पुसलं जाण्याची वेळ आली आहे; आणि तरीही पत्नी म्हणून तिला बिलकुल रडू येत नाही ?

''उर्मिला माते, मी ब्रह्मचारी आहे. जगातील स्नेह-प्रेम यांच्याशी माझा परिचय नाही. चूक झाल्यास क्षमा करा !' एक प्रश्न विचारतो, आपले पती मूर्च्छित पडले आहेत. वेळीच संजीवनी पोहोचली नाही, तर धोका संभवतो. आपल्यावर कोण संकट कोसळेल ! रामसुद्धा रडत आहेत; आणि आपल्या डोळ्यांत पाण्याचं टिपूसदेखील नाही ?''

''हनुमान, यासाठी शोक करायची काय गरज आहे ? मी माझ्या पतीला इतरांपेक्षा अधिक जवळून ओळखते.''

''मातोश्री, आपण लक्ष्मणांस चांगलं ओळखता, हे अगदी खरं आहे.''

''हां, तर ऐका ! माझ्या पतीच्या नसानसात, रोमारोमात राम वसलेले आहेत. त्यांच्या शरीरात बाण मारण्यासाठी जागाच शिल्लक नाही, याची मी साक्ष देते. त्यांच्या मुखात अखंड रामस्मरण चालू असतं. बाण लागला तर माझ्या पतीला लागणार नाही; तो बाण रामाला लागेल. मी लंकेत गेले नाही, पण इथे बसून सांगू शकते, यावेळी लंकेत कोण-कोण रडत आहेत ते !''

''राम रडत आहेत, माते !''

''कोण झोपलं आहे ?''

''लक्ष्मण झोपले आहेत, माते !''

''खरं तर ज्यांना बाण लागला आहे त्यांनी रडायला पाहिजे. ज्यांना काहीच झालेलं नाही ते निद्रिस्त आहेत. रामाला माझ्या पतीची दया आली, किती वेळ जागत राहणार, थोडा वेळ तरी झोपू दे !'' ब्रह्मांडाला भस्मिभूत करण्याचं व जीवित करण्याचं सामर्थ्य रामात आहे.''

''धन्य हो, माते !'' हनुमान वदले.

## त्याग आणि समर्पण

अयोध्यापती राम आणि राजपरिवार संध्याकाळच्यावेळी राजमहालात बसले होते. राम कौसल्या मातेला म्हणाला,

■ ''मी अयोध्येचा राजा झालो. आता प्रजाजनांची इच्छा पूर्ण करणं माझं इतिकर्तव्य आहे.'' ■ पहिल्यांदा भरताला त्याची इच्छा व्यक्त करण्यास सांगण्यात आलं.

भरत विनम्रतेने रामाच्या समोर येऊन उभा राहिला. ■ ''राज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने तुला काय देऊ, भरत ?'' रामाने भरताला विचारले. ■ भरताचे डोळे आसवांनी डबडबून आले... ■ ''महाराज, मला काही नको. आपल्या चरणस्पर्शाने मला जो आनंद मिळतो तो वाढत राहो ! चरणस्पर्शाचं सौख्य मला अखंड, सदासर्वदा लाभो !''

भरताची धर्मपत्नी मांडवी आली. ■ ''मांडवी, तुला काय देऊ ?'' रामाने विचारले. ■ ''रघुकुळात पुत्रवधू होण्याचं सौभाग्य मला मिळालं; आणखी दुसरं सुख असं ते काय असणार, महाराज ? माझी अन्य कोणतीही इच्छा नाही.''

लक्ष्मण आला. रामाने विचारले, ■ ''लक्ष्मण, तुला काय देऊ ?''

''महाराज, बालपणापासून आपल्या सहवासात राहिलो. जीवनाच्या अंतापर्यंत मला आपल्या सहवासात ठेवा ! कधीही अलग करु नका.''

लक्ष्मणाची धर्मपत्नी उर्मिला आली.

''तुला काय पाहिजे, उर्मिले ?'' रामाने विचारले.

''महाराज, कोणत्याही कठीण परिस्थितीत माझा धीर खचू नये; तसेच संकटाला सामोरं जाण्याचं धैर्य मला प्राप्त होऊ

दे !''

शत्रुघ्न आला. ■ ''शत्रुघ्न, तुला काय पाहिजे ते माग!'' रामाने विचारले.

''महाराज, मला रात्रंदिवस भरताच्या चरणसेवेत लीन होऊ द्या !''

शत्रुघ्नची धर्मपत्नी श्रुतकीर्ति आली. रामाच्या चरणांना स्पर्श करून प्रणाम केला.

''श्रुतकीर्ति, बोल, तुला काय देऊ ?'' रामाने विचारले.

श्रुतकीर्तिचे डोळे पाण्याने भरून आले. डोळ्यांतील आसवं पुसत-पुसत म्हणाली, ''प्रभु खरंच मागू ?''

''हां, माग ?''

''मी मागेन ते द्याल ना ?''

''हो ! अवश्य देईन.''

''आपण वनवास संपवून आज आला आहात. आपला राज्याभिषेक सोहळा पार पडला. आपण आलात तेव्हा स्नान केलं. राजाची वस्त्रं परिधान केलीत. प्रभु ! चौदा वर्षे वनवासात आपण जी वल्कले परिधान करीत होता ती प्रसादाच्या रुपात मला द्या !''

''वल्कले ?''

''हां प्रभु ! रघुकुळात वल्कलांचीच उणीव आहे. बाकी सर्वकाही संपन्न आहे. रघुकुळातील कुणा व्यक्तीला पुन्हा केव्हा वनवासात जाण्याची वेळ येईल, ते सांगता येत नाही. आजच्या सुखी जीवनात आपल्या वल्कलांना आम्ही कदापिही विसरणार नाही; आणि आमच्यावर वनवासात जाण्याची वेळ आलीच, तर आपली वल्कले पाहून सर्व सुखाचा त्याग करण्यास आम्ही केव्हाही तयार होऊ. म्हणून मला दुसरं काही नको. आपली केवळ वल्कले द्या !''

भगवान रामाने श्रुतकीर्तिला वल्कले अर्पण केली.

## मूर्ति लहान कीर्ति महान !

सीता स्वयंवराचा प्रसंग आहे. राम सिंहासनावरून उठून उभे राहिले. सगळ्यांच्या नजरा रामावर स्थिरावल्या. राम हळूहळू धनुष्याच्या दिशेने चालू लागले. दरबारात उपस्थित सर्व हे दृश्य पहात होते.

सुनयना महाराणी झरोक्यातून पहात होती. तिने आपल्या मैत्रिणीचा हात पकडला, ■ ''ताई ! या मंडपात जमलेले सर्व लोक कौतुक पहाण्यासाठी जमले आहेत. आम्ही ज्यांना हितेच्छु समजतो तेही आज नजरा रोखून पाहात आहेत. रावण आणि सहस्त्रार्जुन जे धनुष्य तीळभरही हलवू शकले नाहीत, तेच धनुष्य कोवळ्या वयाचा कौसल्यापुत्र राम कसा उचलू शकेल ? महाराजांना कोणी समजावीत का नाही ? रामाला जर काय झालं तर अयोध्येला आम्ही कसं तोंड दाखविणार ? कौसल्या मातेची कूस रिकामी होणार ?'' अशा प्रकारे सुनयना राणी व्याकुळ होऊन रामाबद्दल वाटणारं वात्सल्य, मातृत्व भाव प्रगट करीत होती.

''माते, माफ कर ! एक गोष्ट सांगू, सृष्टीचा नियम असा आहे की, दिसायला लहान व्यक्तीही अचाट कार्य करू शकते. सूर्य दिसायला किती लहान आहे; परंतु संपूर्ण पृथ्वीचा अंधार तो नष्ट करतो. अगस्त्य महाराज काजळात समुद्र पाहात होते; त्यांना लहान कसं म्हणणार ? कामदेव फुलांच्या बाणाने मोहित करतात; त्यांना लहान कसं म्हणणार ? दीड फुटाचा अंकुश हत्तीसारख्या प्रचंड प्राण्याला आवरतो; त्याला लहान कसं म्हणणार ? मंत्र एक अक्षरी असो किंवा गुप्तपणे जपला जावो, मात्र ब्रह्मांडातील देवतांना अंकित करतो; त्या मंत्राला लहान कसं म्हणणार ? हे देवी, श्रीराम दिसायला लहान आहेत; परंतु त्यांची शक्ती असामान्य आहे. आपण रामाला लहान समजता; परंतु त्यांनी त्राटिका राक्षसीणीला मारलं आहे. मारीच, सुबाहू इत्यादी राक्षसांचा नाश केला आहे. अहिल्येचा उद्धार केला आहे. म्हणून आपण रामाला लहान समजू नका. त्यांचा केवळ देह पाहून शक्तीचं मापन करू नका.'' ■ हे प्रतिपादन ऐकून महाराणी सुनयना यांचं गोंधळलेलं मन शांत झालं.

## माया

एक महात्मा जनक राजाला विचारतो, ■ ''माया म्हणजे काय ?'' ■ महात्मा एक थोर विद्वान होते. जनक राजाबरोबर शास्त्र-विद्या शिकण्यास यायचे.

जनक राजा म्हणाले, ■ ''योग्य वेळी आपल्या प्रश्नाचं उत्तर देईन.''

एके दिवशी दोघेही स्नान करीत होते.

''महाराज, घोटाळा झाला !'' धापा टाकीत आलेल्या पहारेकऱ्याने सांगितले.

''काय झालं ?''

''महाल आगीत भस्म होत आहे !''

जनक राजा पूर्ववत स्नान करीत राहिले; परंतु महात्मा मात्र महालाकडे धावला. थोड्याच वेळात परत आला.

''कुठे गेला होतात ?''

''आपण ऐकलं नाही ? महाल जळाला आहे !''

''महाल तर माझा जळाला. आपल्याला धावत-पळत जाण्याची काय आवश्यकता होती ? ''

''महाराज ! महाल आपला होता; परंतु त्यामध्ये माझं एक अंतर्वस्त्र वाळत होतं.''

जनक राजा म्हणाले, ■ ''आता समजलं, तुम्ही विचारत होता ती हीच 'माया' होय !''

## भाग्यवान कोण ?

चित्रकूटमधील प्रसंग... लक्ष्मण फुलं-फळं आणण्यास अरण्यात गेला होता. राम-सीता चर्चा करीत बसले होते. वसंत ऋतुचं आगमन झालं असल्यामुळे वृक्ष-वल्ली, फुलां-फळांना बहर आला होता. एका वृक्षावर एक वेल वाढत होती. वेल वृक्षाच्या आधारे वाढलेली पाहून सीता रामाला म्हणते, ■ ''आर्यपुत्र, ही वेल किती भाग्यवान आहे ! सुंदर वृक्षाच्या आधारे ती वाढत आहे.''

''असं नाही, सीता ! तू किती विरोधाभासाने बोलत आहेस. वेलीपेक्षा भाग्यवान तो वृक्षच आहे; कारण ती सुंदर वेल त्या वृक्षावर वाढत आहे. त्या वृक्षाची शोभा वाढवित आहे.''

दोघंही त्या वेल व वृक्षाविषयी चर्चा करीत आहेत. सीतेला असं सुचवायचं आहे की, मी किती भाग्यवान आहे; कारण आपल्यासारखा पती मला मिळाला; तर रामाला असं सुचवायचं आहे की, मी किती भाग्यवान आहे; कारण तुझ्यासारखी पत्नी मला मिळाली.

इतक्यात लक्ष्मण आला. राम-सीता दोघांनीही लक्ष्मणाला निर्णय देण्यास विनंती केली.

''कृपया, मला अशा अनाकलनीय गोष्टीत गुंतवू नका,'' लक्ष्मण म्हणाला.

तरीही, राम-सीता दोघांनीही लक्ष्मणाला निर्णय देण्याचा आग्रह केला. तेव्हा लक्ष्मणाने निर्णय दिला, ■ ''महाराज, आपल्याला आणि माझ्या या सीतामातेला वाईट वाटणार नाही, तर सांगतो, वेल व वृक्ष दोघंही भाग्यवान नाहीत.''

''तर, कोण भाग्यवान आहे ?''

''भाग्यवान लक्ष्मण आहे; कारण या वृक्षाच्या आणि वेलीच्या कृपेची छाया त्याला मिळते आहे.''

## दैवी शक्ती

जनक राजाला शिवधनुष्य देण्यात आले तेव्हा योग्य जागी ठेवण्यासाठी अनेक हत्तींच्या मदतीची गरज भासली. ही एक पौराणिक घटना आहे.

जनक राजा रोज धनुष्याची पूजा करायचे. त्यांनी कन्या सीतेला धनुष्याच्या आजूबाजूची जागा गायीच्या शेणाने पवित्र करण्यास सांगितले. सीता रोज धनुष्याच्या आजूबाजूची जागा गायीच्या शेणाने पवित्र करायची. नंतर जनक राजा पूजा करायचे.

एक दिवस सीतेला वाटलं, रोज धनुष्याच्या आजूबाजूची जागा पवित्र होते; परंतु धनुष्याखालील जागा तशीच राहते. आज सगळी जागा पवित्र करायची. सीतेने डाव्या हाताने धनुष्य उचलून त्याखालील जागा उजव्या हाताने पवित्र केली; आणि धनुष्य खाली ठेवून सीता निघून गेली.

थोड्याच वेळात जनक राजा पूजा करण्यास आले. धनुष्याच्या खाली शेण लावलेलं पाहून आश्चर्यचकित झाले.

''धनुष्याच्या खाली शेण कोणी लावलं ?''

''मी लावलं. रोज आजूबाजूला शेण लावीत होते; परंतु धनुष्याखालील जागा तशीच राहात होती. मला वाटलं, धनुष्याखालील जागाही पवित्र व्हायला हवी.''

जनक राजा विचारात पडले, हे धनुष्य उचलं कसं आणि शेण लावलं कसं ?

''मुली, हे धनुष्य कोणी उचललं ?''

''मी''

''तू कसं उचललंस ?''

''असं,'' म्हणून सीतेने धनुष्य उचलून परत जागच्या जागी जसं होतं तसं ठेवलं.

जनक राजा मनोमन समजले, सीता एक ईश्वरी शक्ती आहे. ईश्वरी शक्ती जगामध्ये प्रगट झाली आहे.

## रामनाम

चार चोर चोरी करण्यास गेले. शरयू नदी पार करून जायचं होतं. नदीला पूर आला होता. नदी पार होण्याची चोरांना फार घाई लागली होती. नदी पार करण्याचे अनेक प्रयत्न करूनही सफल झाले नाहीत. अंतिम उपाय एक चोर सुचवितो, समोर संत तुलसीदास यांची झोपडी आहे. आपण तेथे जाऊ. ते नदी पार करण्याचा काहीतरी मार्ग सांगतील.

सर्वांनी थोडा वेळ विचार केला. शेवटी तुलसीदास यांच्याकडे आले. मध्यरात्र झाली होती. तुलसीदास रामनामाचा जप करीत होते. चोरांनी त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवलं.

''आपण कोण आहात ?''

''महाराज, आम्ही चोर आहोत. चोरी करण्यासाठी गेलो होतो. चोरीचा माल आमच्याजवळ आहे. आम्ही संकटात आहोत. तुमच्या रामाने राक्षसांचा स्वीकार केला होता. आपण चोरांचा स्वीकार नाही का करणार ?''

''तुम्ही माझ्या झोपडीत निवांत झोपून राहा! मी बाहेर निघून जातो. याव्यतिरिक्त आणखी मी तुमच्यासाठी काय करू शकेन ? शरणार्थींना शरण देणं, या धर्माचं मी पालन करतो